www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक

# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ४५ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शनिवार, २२ जून २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात

### रिझवी महाविद्यालयाच्या ४ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू, खालापूर तालुक्यातील वावर्ले येथील घटना

● अलिबाग, दिगंबर जाधव :

मुंबईतील रिझवी महाविद्यालयातील वर्षासहलीसाठी आलेल्या ४ विद्यार्थ्यांचा बडून मृत्यू झाला. खालापूर तालुक्यातील वावर्ले येथे असलेल्या छोट्या धरणात ही घटना घडली. रिझवी कॉलेजमधील ३७ विद्यार्थी खालापूर तालुक्यातील सोंडई येथे ट्रेकींगसाठी आले होते. ज्यात १७ मुलींचाही समावेश होता. ट्रेकींग आटोपल्यानंतर सर्वजण धावडी नदीवर असलेल्या छोट्या बंधाऱ्यावरील सांडव्यात डुंबण्यासाठी उतरले. पान २ वर

### भारत-श्रीलंका यांचा द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यावर भर



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी श्रीलंकेचे राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे यांची गुरुवारी भेट घेतली. या भेटीत द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यावर भर देण्यात आला. यावेळी ऊर्जा क्षेत्रात सहकार्य, बंदर पायाभूत सुविधा, विमान वाहतूक, आरोग्य, अन्न तसेच सुरक्षा, शिक्षण आणि पर्यटन क्षेत्र आदींबाबत सहकार्याबाबत चर्चा केली.

पान २ वर

### मुकेश अंबानींच्या डीपफेक व्हिडिओचा वापर करुन 7 लाखांची फसवणूक




● मुंबई, विशाल कारंडे :

गुंतवणुकीत चांगला परतावा देण्याच्या नावाखाली फसवणाऱ्या टोळीकडून उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या डिफेक व्हिडिओचा वापर करुन फसवणूक करण्याच आली आहे. या व्हिडिओत मुकेश अंबानी हे 'राजीव शर्मा ट्रेड ग्रुप' याकंपनी बद्दल उच्चार करत आहेत. या कंपनीमध्ये BCF मध्ये गुंतवणूक करण्यास सांगत असल्याचा तो व्हिडिओ आहे.


पान २ वर

## पोलीस भरतीसंदर्भात देवेंद्र फडणवीसांची महत्वाची माहिती

# ज्या ठिकाणी पाऊस, त्या ठिकाणच्या उमेदवारांच्या मैदानी चाचण्या पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत

● मुंबई, दिगंबर जाधव





राज्यात १९ जूनपासून सार्वत्रिक पोलीस भरती सुरू झालेली आहे. राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यात १७ हजार ४७१ पदांसाठी ही पोलीस भरती प्रकिया पार पडत आहे. या भरती प्रकियेसाठी सध्या उमेदवारांची मैदानी चाचणी सुरू आहे. मात्र, अनेक ठिकाणी पावसामुळे उमेदवारांच्या मैदानी चाचणीला अडचणी येत आहेत. पावसामुळे पोलीस भरतीच्या मैदानी चाचणीसाठी मैदान सुस्थितीत राहत नाही. त्यामुळे त्याचा मैदानी चाचणीवर परिणाम होत असल्याचं काही उमेदवारांचं म्हणण आहे. याबाबत आता राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात महत्वाची माहिती दिली आहे. 'ज्या ठिकाणी पाऊस आहे. अशा ठिकाणच्या उमेदवारांच्या मैदानी चाचण्या पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत', अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी आज माध्यमांशी बोलताना दिली.

"राज्यात पोलीस भरतीची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, ज्या ठिकाणी पावसामुळे व्यत्यय निर्माण झाला असेल त्या ठिकाणच्या पोलीस भरतीच्या मैदानी चाचणी घेण्यासाठी पुढच्या तारखा देण्यात आलेल्या आहेत. मात्र, ज्या जिल्ह्यात पाऊस नाही तेथे भरती प्रक्रिया राबण्यात येत आहे. पान २ वर

### देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

"राज्यात पोलीस भरतीची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, ज्या ठिकाणी पाऊस आहे. त्या ठिकाणच्या उमेदवारांच्या मैदानी चाचण्या पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. आता यापुढे अजून पाऊस वाढण्याची शक्यता आहे. त्यानंतर विधानसभा निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता लागेल. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या पोलीस भरतीच्या मैदानी चाचण्या आणखी पुढे गेल्या तर अनेक उमेदवारांसाठी ही शेवटची संधी असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्यावर परिणाम होतो. मात्र, त्या उमेदवाराला ती संधी मिळायला हवी", असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## पत्नीला भुलीचं इंजेक्शन, गाडीपर्यंत फरफटत नेऊन डांबलं

■ वटपौर्णिमेला पुण्यातील संतापजनक घटना समोर



● पुणे, अभिजित येरल्लू :

पिंपरी चिंचवडमध्ये वटपौर्णिमेच्या दिवशी एक संतापजनक घटना समोर आली आहे. एका विवाहित महिलेचं भरदिवसा अपहरण करण्यात आलं. ऑफिसमधून गाडीपर्यंत तिला फरफटत नेण्यात आलं. दोन दिवस तिला वारंवार भुलीचं इंजेक्शन देत, गाडीतचं डांबून ठेवण्यात आलं. कशीबशी तिनं स्वतःची सुटका केली अन् वाकड पोलीस स्टेशन गाठलं. अंगावर काटा आणणारा प्रताप महिलेच्या पतीनेचं केला होता. सुमित शहाणे असं या पतीचं नाव आहे. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया आता सुरू झाली आहे.

पुण्याच्या मंचरमधील हे दाम्पत्य असून ऑगस्ट 2023 मध्ये या दोघांचं लग्न झालं. मात्र आठवडाभरात पती सुमितने नको त्या मागण्या सुरू केल्या, ज्या पत्नीला पचनी पडल्या नाहीत. मग तिने सुमितपासून लांबच राहणं पसंत केली. तिने थेट मुंबई गाठली, तिथं काही महिने ती मैत्रिणीकडे राहिली. पान २ वर

## 'नीट'नंतर आता सीईटी परीक्षेत मोठा गोंधळ, पेपरमध्ये ५४ चुका - आदित्य ठाकरे

● मुंबई, विशाल कारंडे :



राज्यातील सीईटी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला होता. त्यानुसार विद्यार्थी आता पुढील प्रवेश प्रक्रियेची तयारी करत होते. अशातच आता या सीईटी परीक्षेत मोठा गोंधळ झाल्याचा दावा आमदार आदित्य ठाकरे यांनी केलाय. पत्रकार परिषद घेत ठाकरे यांनी परीक्षेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत राज्य सरकारला धारेवर धरलं.

"सीईटी सेलकडून गुणांऐवजी पर्सेंटाईल दिले जातात. त्यामध्ये देखील गोंधळ झालाय. कमी गुण मिळालेल्यांना जास्त पर्सेंटाईल आणि जास्त गुण मिळालेल्यांना कमी पर्सेंटाईल देण्यात आले आहेत. त्यामुळे पर्सेंटाईल ठरविण्याचे नेमके निकष काय आहेत, याची माहिती सीईटी सेलने देण्याची गरज आहे. सीईटी सेलच्या कारभारात पारदर्शकता नाही," असा आरोप आमदार आदित्य ठाकरेंनी केला. या परीक्षेत गैरव्यवहार झालाय. त्यामुळं सीईटीच्या आयुक्तांना निलंबित का करण्यात आलं नाही?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

## पीएम किसान योजनेचा हफ्ता रखडल्याने शेतकऱ्याचे टोकाचे पाऊल



● यवतमाळ, सचिन कदम :

यवतमाळच्या पुसद तालुक्यातील श्रीरामपूर येथून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. पीएम किसान योजनेचा (PM Kisan Yojana) हफ्ता रखडल्याने संतप्त शेतकऱ्याने टोकाचे पाऊल उचलले आहे. सुदैवाने हा प्रकार वेळीच रोखल्याने मोठा अनर्थ टळला आहे. झाले असे की, शेतकरी श्याम काळे यांनी थेट विषाचा डब्बा घेऊन पुसद येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालय गाठले. पान २ वर

### हफ्ते रखडल्याने शेतकऱ्याचे टोकाचे पाऊल

हल्लीचा काळ शेतकऱ्यांच्या अनुषंगाने महत्वाचा काळ आहे. राज्यात मान्सूननं एंट्री केली असून शेतीच्या कामाला वेग आले आहे. अशातच पीएम किसान योजनेचा हफ्ता रखडल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. अशीच काहीशी परिस्थिती श्याम काळे यांची देखील आहे. वारंवार ऑफिसच्या चकरा मारून सुद्धा अधिकारी कर्मचारी दखल घेत नाही. तसेच सध्याच्या दुबार पेरणीच्या संकटामुळे ते हवालदिल झाले आहे. अधिकारी शेतकऱ्यांच्या भावना समजून घेत नाही. आर्थिक अडचणीत सापडलेले असताना पुढे हे आर्थिक संकट मोठ्या प्रमाणात ओढावेल, या भीतीने विष प्राशन करण्याचा निर्णय मी घेतला, अशी व्यथा शेतकऱ्याने यावेळी बोलताना मांडली. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी या शेतकऱ्याची समजूत काढली आणि या शेतकऱ्याला आश्वस्त केल्याने हे प्रकरण निवळले आहे.

## राज्यातील लोकविरोधी महाभ्रष्ट्युती सरकार विरोधात काँग्रेसचे राज्यभर 'चिखल फेको' आंदोलन: नाना पटोले

● मुंबई, विशाल कारंडे :




केंद्रातील आणि राज्यातील भाजपा सरकारने जनतेला वा-यावर सोडून सत्ताधारी मजा मारत आहेत. राज्यात कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे बिघडलेली आहे, महागाई, बेरोजगारीने लोकांना जगणे कठिण झाले आहे. सरकारने बियाणे आणि खतांचा काळाबाजार करून शेतक-यांची लूट सुरु आहे. NEET चे पेपर फोडून विद्यार्थ्यांचे भविष्य उद्धवस्त करणा-या भ्रष्टाचारी महायुती सरकारविरोधात काँग्रेसने आज राज्यभरात चिखल फेको आंदोलन केले आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली. टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, राज्यातील भाजपा सरकारमध्ये भ्रष्टाचार बोकाळला आहे. डीबीटी योजनेतून शेतकऱ्यांना किटकनाशके, स्प्रे पंप, खते, औषधे दिली जातात पण त्यात २७०० रुपयांच्या स्प्रे पंपची किंमत वाढवून ४५०० रुपये करण्यात आली इतर वस्तुही वाढीव दराने खरेदी करून भ्रष्टाचार केला. पान २ वर

## जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणूक लवकरच; २० ऑगस्टपर्यंत मतदार याद्या अद्ययावत करण्याच्या निवडणूक आयोगाच्या सूचना

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



लोकसभेची निवडणूक झाली. आता लवकरच जम्मू-काश्मीर, महाराष्ट्र, हरियाणा आणि झारखंड या चार राज्याच्या विधासभा निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. या राज्याच्या विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाकडून तयारी सुरू करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी आयोगाकडून निवडणूक याद्या अद्ययावत करण्यासंदर्भात सूचना जारी करण्यात आल्या आहेत. या राज्यात विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने २० ऑगस्टपर्यंत मतदार याद्या अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सध्या जम्मू-कश्मीरमध्ये २०१८ पासून विधानसभा अस्तित्वात नाही. काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाकडून केंद्रीय निवडणूक आयोगाला जम्मू-काश्मीरमधील विधानसभेच्या निवडणुका सप्टेंबरपर्यंत घेण्यात याव्यात, असा आदेश देण्यात आलेला आहे. त्यामुळे निवडणूक आयोग आता विधानसभा निवडणुकीसाठी तयारीला लागले आहे. जम्मू-काश्मीर बरोबरच महाराष्ट्र, हरियाणा आणि झारखंड या राज्यांच्याही निवडणुकांच्या तारखा निवडणूक आयोग जाहीर करण्याची शक्यता आहे.

कारण हरियाणा विधानसभेचा कार्यकाळ ३ नोव्हेंबर रोजी संपत आहे. तसेच झारखंड विधानसभेचा कार्यकाळ ५ जानेवारी २०२५ रोजी संपत आहे. तसेच महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबरला संपत आहे. त्यामुळे या निवडणुका निवडणूक आयोगाला घ्याव्या लागणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाकडून या चारही राज्यातील निवडणुकीच्या अनुषंगाने तयारी सुरू करण्यात आली आहे.

इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, निवडणूक आयोगाने जम्मू आणि काश्मीरसह महाराष्ट्र, हरियाणा आणि झारखंड राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना गुरुवारी एक पत्र लिहिलं आहे. या पत्राच्या माध्यमातून संभाव्य तारखा देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच २५ जूनपासून निवडणूक पूर्व विशेष मोहीम सुरु होईल. त्यानंतर मतदार याद्या अद्ययावत करण्यात येतील. पान २ वर

## ओबीसींचं शिष्टमंडळ घेणार मुख्यमंत्र्यांची भेट

● मुंबई, दिगंबर जाधव :



ओबीसी आरक्षणासाठी उपोषणाला बसलेले लक्ष्मण हाके यांच्या आंदोलनाचा आज नववा दिवस असून ते अजूनही आंदोलनावर ठाम आहेत. लक्ष्मण हाके यांच्यासोबत सरकारच्या शिष्टमंडळानं आज भेट घेऊन चर्चा केल्यानंतर आज सायंकाळी पाच वाजता ओबीसींचं शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहे. या शिष्टमंडळात लक्ष्मण हाके यांच्या 4 समर्थकांचा सुद्धा समावेश असणार आहे.

ओबीसीमधून मराठ्यांना आरक्षण नको : मराठा समाजाला कुठल्याही परिस्थितीत ओबीसीमधून आरक्षण देऊ नये यासाठी मागील 9 दिवसांपासून लक्ष्मण हाके बेमुदत उपोषणाला बसले आहेत. यादरम्यान लक्ष्मण हाके यांची अनेक ओबीसी नेत्यांनी भेट घेतली. तसंच त्यांच्या आंदोलनाची दखल घेत सरकारचं शिष्टमंडळ लक्ष्मण हाके यांना भेटलं. यात मंत्री गिरीश महाजन, मंत्री उदय सामंत, मंत्री अतुल सावे आणि आमदार गोपीचंद पडळकर यांचा समावेश होता. याप्रसंगी सरकारी शिष्टमंडळाकडून काही कागदपत्रं लक्ष्मण हाके यांना देण्यात आली. यानंतर ओबीसींचं शिष्टमंडळ आज सायंकाळी 5 वाजता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहे. पान २ वर

## विरारमध्ये झाड पडून महिलेचा मृत्यू, दोन दिवसांनी आढळला बेपत्ता वृद्धेचा मृतदेह



● विरार , यश सावंत :

मागील दोन दिवसांपासून विरारमधून बेपत्ता असलेल्या मंजुळा झा (७०) या महिलेचा मृतदेह शुक्रवारी सकाळी विरारच्या बोळींज येथे आढळला आहे. बुधवारी पावसामुळे चिंचेचे झाड पडून या महिलेचा मृत्यू झाला होता. मात्र ती झाडाखाली दबली गेल्याने दोन दिवस कुणाला त्याबाबत समजले नाही.

मंजुळा झा (७०) ही महिला काही दिवसांपूर्वी विरार पश्चिमेच्या पद्मावती नगर येथील ऋषभ टॉवरमध्ये आपल्या मुलाकडे आली होती. सकाळी नातवाला शाळेत सोडून ती मंदिरात जात असे. मंदिरात फुले वाहण्यासाठी ती आसपासच्या परिसरातून फुले तोडून आणत असे. बुधवार १९ जून रोजी ती नेहमीप्रमाणे नातवाला सोडण्यासाठी बाहेर गेली आणि तेव्हापासून ती बेपत्ता झाली होती. तिचा शोध सुरू होता. याप्रकरणी अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात ती बेपत्ता असल्याची तक्रार देखील दाखल होती. पान २ वर

## मुख्यमंत्री आणि गणेश नाईक विसंवाद मिटता मिटेना

### गणेश नाईकांच्या विधानाची कार्यकत्यांमध्ये चर्चा

● ठाणे, रोहित जैसवार:



कोकण पदवीधर निवडणूक प्रचाराकरिता गेल्या आठवड्यात महायुतीने आयोजित केलेल्या मेळाव्यात माजी मंत्री गणेश नाईक यांनी केलेल्या एका विधानाची चर्चा शिवसेना आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये सुरू आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असले तरीही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच आमचे नेते आहेत, असे विधान गणेश नाईक यांनी केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या असून या विधानामुळे मुख्यमंत्री आणि गणेश नाईक वाद मिटता मिटेना, असे चित्र आहे. ठाणे लोकसभेची जागा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हट्टाने पदरात पाडून घेत गणेश नाईक यांना शह दिल्याची चर्चा होती. ठाणे जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावर गणेश नाईक यांनी अनेक वर्षे काम केले. या पदावर काम करत असताना नाईक यांनी जिल्ह्यावर वर्चस्व प्रस्थापित केले होते. परंतु सत्ता बदल होताच नाईक या पदावरून पायउतार झाले आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पालकमंत्री झाले. यानंतर शिंदे यांनी जिल्ह्यात वर्चस्व निर्माण केले. तेव्हापासून या दोन्ही नेत्यांमध्ये राजकीय वाद रंगला आहे.

नवी मुंबई महापालिकेत गणेश नाईक यांचे वर्चस्व आहे. नगरविकास विभागामार्फत या पालिकेतील प्रशासकीय नियुक्त्यावरून नाईक यांनी नाराजी व्यक्त केली होती. नवीमुंबईचे कारभारी ठरविणारे कोण, असे विधान करत मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीत असलेल्या नगरविकास विभागावर ताशेरे ओढले होते. तसेच या दोन्ही नेत्यांमधील वाद ठाणे लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा दिसून आला. गणेश नाईक यांचे पुत्र, माजी खासदार संजीव नाईक हे भाजपच्या तिकिटावर ठाणे लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. या जागेसाठी नाईक यांचे प्रयत्न सुरू होते. पण, शेवटच्या क्षणी मुख्यमंत्र्यांनी ही जागा पदरात पाडून घेत नरेश म्हस्के यांची उमेदवारी जाहीर केली. पान २ वर

## संपादकीय

# नव्या कृषिमंत्र्यांकडून अपेक्षा

नव्या एनडीए सरकारमध्ये कृषी मंत्रिपद शिवराजसिंग चौहान यांच्याकडे सोपविले आहे. भारतातील कृषीविषयक समस्यांचा निपटारा त्यांना करावा लागणार आहे.'कापूस, सोयाबीन आणि कांदा उत्पादक शेतकयांना योग्य भाव न मिळणे तसेच निर्यातबंदी वगैरे चुकीच्या धोरणांमुळे आम्हाला लोकसभा निवडणुकीत फटका बसला', अशी कबुली आता सत्ताधारी देत आहेत. पिकांना किमान आधारभाव किंवा एमएसपी मिळालीच पाहिजे, अशी देशभरातील शेतकयांची सरकारकडे मागणी आहे. नरेंद्र मोदी सरकारच्या पहिल्या टर्ममध्ये, म्हणजेच 2014 नंतरच्या पाच वर्षांच्या कालावधीत शेतीचे जेवढे तीव्र संकट निर्माण झाले होते, तसे ते दुसर्या टर्ममध्ये निर्माण झाले नव्हते. पहिल्या टर्ममध्ये पिकांचे उत्पादन कमी झाले आणि शेतीमालाचे भावदेखील तसे पडलेलेच होते. मात्र जगातील शेतीमालाचे भाव 2014 नंतर कोसळलेले होते. त्यात भारत सरकारने 2016 साली अचानकपणे नोटाबंदीचा निर्णय घेतल्यामुळे असंघटित क्षेत्र कोलमडून पडले. परिणामी शेतीमालाची मागणी कमी झाल्यामुळे शेतकर्यांचे प्रचंड नुकसान झाले. त्यानंतर केंद्र सरकारने एमएसपीमध्ये वाढ जाहीर केली, पण ती देखील अतिशय कमी होती. त्यामुळे शेतकर्यांचे समाधान झाले नव्हते. म्हणूनच मग दरवर्षी शेतकयांच्या खात्यात सहा हजार रुपये वर्ग करणारी 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना डिसेंबर 2018 पासून अमलात आणण्यात आली. त्यानंतर चार महिन्यांतच 2019 सालच्या लोकसभा निवडणुका होणार होत्या. म्हणजे मुळात राजकीय लाभाचा विचार करूनच ही योजना सुरू करण्यात आली होती!

2014 ते 2019 या कालावधीत कृषी विकासाचा दर 3.19 टक्के होता, तर 2019 ते 2024 या कालावधीत तो एक टक्क्याने वाढून 4.19 टक्क्यांवर जाऊन पोहोचला. हा विकासदर मोजताना धान्य पिके, फळे व भाज्या, दूध, कुक्कुटपालन, वन तसेच मत्स्योत्पादन या सगळ्यांचा विचार केलेला असतो. गेल्या पाच वर्षांत धान्य पिकांच्या उत्पादनात लक्षणीय वृद्धी झाली. तसेच अंड्याच्या उत्पादनाचा वेगही जवळपास तीन टक्क्यांनी वाढला. मात्र मत्स्य उत्पादन, वन उत्पादन, दूध यामध्ये घट अनुभवास आली. पिकांचे उत्पादन वाढण्याचे प्रमुख कारण म्हणजे, मागच्या पाच वर्षांपैकी फक्त 2023-24 या एका वर्षांतच अत्यल्प पाऊस झाला. उलट मोदी सरकारच्या पहिल्या टर्ममध्ये तीन वर्षे अशी होती की, पाऊस अत्यंत कमी आणि अनियमित होता. तसेच अवकाळी पावसामुळे प्रचंड नुकसान सहन करावे लागले.

भारत सरकारच्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने दिलेल्या आकडेवारीनुसार, मात्र 2023-24 या वर्षांत कृषी क्षेत्र हे केवळ 1.4 टक्क्यांनी वाढले. 2014-15, 2015-16 आणि 2018-19 या वर्षांत कृषी क्षेत्राची वाढ 0.2 टक्के 0.6 टक्के आणि 2.10 टक्के एवढीच होती. परंतु शेती उत्पादन कितीही झाले, तरीदेखील त्याला योग्य भाव न मिळाल्यास, शेतकर्यांचे उत्पन्न वाढत नसते. 2014 ते 2019 पेक्षा 2019 ते 2024 या काळात शेतीमालाला तुलनेने अधिक भाव मिळाले, हे खरे आहे. संयुक्त राष्ट्रांची 'फूड अँड ॲग्रिकल्चर ऑर्गनायझेशन' ही संस्था जगभरच्या अन्नधान्यांच्या किमतींचा अभ्यास करत असते. तिने नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार ज्यावेळी देशात डॉ. मनमोहन सिंग सरकार होते, तेव्हा अन्नधान्याचा जागतिक भाव निर्देशांक 2012-13 आणि 2013-14 मध्ये 122 अंश आणि 119 अंक इतका होता. मोदी यांच्या पहिल्या पर्वात जागतिक अन्नधान्याचा निर्देशांक पहिल्या दोन वर्षात 90 अंशावर घसरला होता. परंतु 2021-22 आणि 2022-23 मध्ये तो 133 आणि 140 अंशावर जाऊन पोहोचला.

कमॉडिटीजचे जागतिक भाव उच्चस्तरावर पोहोचल्यामुळे, 2021-22 मध्ये भारताने 50 अब्ज डॉलर्सची आणि 2022-23 मध्ये 53 अब्ज डॉलर्सची धान्य निर्यात केली. त्या तुलनेत 2013-14 ते 2019-20 या काळात भारताची शेतीमाल निर्यात 43 अब्ज डॉलर्सवरून 35 अब्ज डॉलर्सवर घसरलेली होती.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील भाव घसरल्यामुळे, त्याचा फटका भारतीय बाजारपेठेस बसला. मोदी 2 मध्ये शेतीमालाचे चढलेले भाव आणि त्यामुळे जबरदस्त प्रमाणात आपण केलेली निर्यात याच्या परिणामी भारतातील अन्नधान्याच्या किमतीत लक्षणीय वृद्धी झाली. हे प्रमाण अगोदरच्या पर्वाच्या दुप्पट होते. वाढत्या निर्यातीमुळे देशांतर्गत बाजारपेठेत 6 टक्के भाववाढ झाली. एकूण 2019 ते 2024 या कालावधीमध्ये शेतीमालाचे उत्पादन आणि प्रतिकिलोला मिळणारे उत्पन्नही लक्षणीयरीत्या वधारले. पंजाब, हरियाणा आणि

उत्तर प्रदेशमधील शेतकरी कृषी कायद्यांच्या विरोधात रस्त्यावर उतरले. एमएसपी, शेतीमालाची आयात आणि निर्यातबंदी यासंबंधीच्या समस्यांमुळे देशभरचा शेतकरी नाराज होता. परंतु हा मुद्दा वेगळा. आज शेतीमालाचे भाव पडले आहेत आणि त्यामुळे सार्वत्रिक नाराजी आहे, असे मात्र गेल्या चार- पाच वर्षांत दिसून आलेले नाही.

यूपीए सरकारच्या दहा वर्षांच्या काळात कृषिविकासाचा दर सरासरी 3.5 टक्के होता, तर मोदी यांच्या काळात तो 3.7 टक्के होता. मोदी यांच्या काळात पिकांची वाढ कमी झाली. फळे व भाज्यांचे उत्पादन गेल्या दहा वर्षांत दोन टक्क्यांपेक्षा कमी गतीने वाढत आहे. उलट शरद पवार कृषिमंत्री असताना ही वाढ 3.4 टक्के या गतीने झाली होती. गेल्या दहा वर्षांत पशुधन व मत्स्यविकास अधिक गतीने झाला.



## आजची चित्रोळी

हिंस्त्र कितीहि असलो तरी,
बाळाचा मी आहे बाप !
जीवन जगतांना पोटासाठीं,
करावें लागते थोडे पाप !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### रिझवी महाविद्यालयाच्या ४ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू...

मात्र वर्षासहलीचा आनंद लुटत असतांना यातील चार जण बुडाले.घटनेची माहिती मिळताच, खालापूर पोलिसांनी स्थानिक बचाव पथकांच्या मदतीने शोध व बचाव कार्य सुरू केले. बचाव पथकांनी बेपत्ता असलेल्या चौघांचा शोध घेऊन बाहेर काढले. मात्र चौघांचाही मृत्यू झाला होता. एकलव्य सिंग, ईशांत यादव, आकाश माने आणि रणत बंडा अशी चौघांची नावे आहेत. चौघांचे मृतदेह चौक येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले आहेत. मृतांच्या नातेवाईकांना घटनेची माहिती देण्यात आली असून पुढील कारवाई पोलीस आणि आरोग्य विभागा मार्फत केली जात आहे.

### भारत-श्रीलंका यांचा द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यावर भर...

भारत आणि श्रीलंका यांच्यातील पारंपरिकपणे घनिष्ठ आणि मैत्रीपूर्ण संबंध वाढविण्यावर यावेळी भर देण्यात आला.

तसेच भारत आणि श्रीलंका यांना जोडण्यासाठी सागरी सेतू बांधण्याची तयारी सुरू आहे. भारत आणि श्रीलंका यांच्यातील प्रस्तावित भू-लिंक संदर्भात अभ्यास अंतिम टप्प्यात आहे, असे यावेळी श्रीलंकेचे राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे यांनी सांगितले. यावेळी विक्रमसिंघे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अभिनंदन केले. जयशंकर यांनी पंतप्रधान दिनेश गुणवर्धने यांचीही भेट घेतली आणि भारताच्या भक्कम समर्थनाचा पुनरुच्चार केला.

### मुकेश अंबानींच्या डिफेक व्हिडिओचा वापर...

ओशिवरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल दरम्यान, या आधीही मार्च महिन्यात अशाच प्रकारे गुंतवणूक कण्याबाबतचा व्हिडिओ सोशल मिडियावर अपलोड करण्यात आला होता.

दरम्यान, डॉ. के. के. पाटील यांनी दिलेल्या तक्रारीनुसार 28 मे ते 10 जून दरम्यान जास्त परतावा देण्याच्या नावाखाली संबधित कंपनीत 7 लाखांची गुंतवणूक 16 वेगवेगळ्या खात्यांवर पाठवली आहे. मात्र, कालंतराने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पाटील यांनी गुंतवलेले पैसे काढण्याचा प्रयत्न केला. दरम्यान पाटील यांनी ओशिवरा पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसानी अनोळखी व्यक्ती विरोधात फसवणूक आणि आयटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी ओशिवरा पोलिस अधिक तपास करत आहेत.

### पोलीस भरतीसंदर्भात देवेंद्र फडणवीसांची महत्वाची...

तसेच जे विद्यार्थी मैदानी चाचणीसाठी येत आहेत, त्यांच्या राहण्याची व्यवस्था करण्यासंदर्भात आम्ही सूचना केलेल्या आहेत", अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

विद्यार्थ्यांनी केलं होतं आंदोलन

पोलीस भरतीची प्रक्रिया सध्या सुरु आहे. मात्र, अनेक ठिकाणी पाऊस पडत असल्यामुळे मैदानावर पाणी साचत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्याना मैदानी चाचणीसाठी अडचणी निर्माण होत असल्याच्या तक्रारी अनेक विद्यार्थ्यांनी केल्या होत्या. अमरावतीत काही विद्यार्थ्यांनी आक्रमक होत आंदोलन केलं होतं. तसेच पोलीस भरती पुढे ढकलण्याची मागणी केली होती. मात्र, त्या पार्श्वभूमीवर आता गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्वाची माहिती दिली आहे. "ज्या ठिकाणी पाऊस आहे. त्या ठिकाणची पोलीस भरतीसाठीची मैदानी चाचणी पुढे ढकलण्यात आली असून त्यासाठी पुढच्या तारखा देण्यात येतील", असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे.

### पत्नीला भुलीचं इंजेक्शन, गाडीपर्यंत फरफटत नेऊन...

त्यानंतर काही दिवसांपूर्वी ती नोकरीसाठी पिंपरी चिंचवडमध्ये आली. इथं एका बांधकाम व्यवसायिकाकडे काम सुरू केलं. याचा सुगावा सुमितला लागला अन् त्यानं पत्नीच्या ऑफिसचा पत्ता काढला. 19 जूनला सुमित आई आणि चालकासोबत वाकडमध्ये आला. दुपारी साडे तीनच्या सुमारास पत्नीला फरपटत गाडीत बसवलं. त्यावेळी पत्नीचा मित्र ही जबरदस्तीने गाडीत बसला. गाडी मंचरच्या दिशेने निघाली, थोडं पुढं गेल्यावर सुमितने पत्नीच्या मित्राला कानशिलात लगावली आणि गाडीतून बाहेर ढकलून दिलं. तिथून पुढचा प्रवास सुरु झाला. त्या प्रवासात सुमितने पत्नीला भुलीच इंजेक्शन दिलं. थेट घरी न जाता गाडीतच डांबून ठेवलं. या दरम्यान ती शुद्धीवर आली की तो वारंवार भुलीच इंजेक्शन द्यायचा, असा आरोप पत्नीने केलाय.

बेशुद्ध असताना नेमकं काय-काय घडलं?

20 जूनच्या दुपारी तिने सुमितला विश्वासात घेतलं, तो सांगतोय त्या कागदपत्रांवर सही करते, असं ती म्हणाली. मग सुमितने गाडी मंचर परिसरात आणली, मात्र माझी भूल अद्याप उतरली नाही, असा बहाणा तिने केला, मग ते मंदिरात थांबून राहिले. त्यावेळी पत्नीने एका तरुणास खुनवत, मदतीची मागणी केली. त्या तरुणाला ही काहीतरी गडबड असल्याचं समजलं, मग तिथं मंचर पोलिसांना बोलवण्यात आलं. पोलीस मंदिरात पोहचले अन पत्नीची सुमितच्या तावडीतून सुटका झाली. घडला प्रसंग विवाहित महिलेने सांगितला असून तिचे पती, आई आणि चालकावर अनेक आरोप आहेत. आज सकाळी पत्नीने वाकड पोलीस स्टेशन गाठलं असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. अपहरण ते सुटका या दरम्यान बेशुद्ध असताना नेमकं काय-काय घडलं, याचा तपास पोलिसांकडून केला जाणार आहे.

### पीएम किसान योजनेचा हफ्ता रखडल्याने शेतकऱ्याचे...

कवडीपूर येथे शेत असलेल्या या शेतकऱ्याचे पीएम किसानचे हप्ते रखडल्याने थेट कृषी कार्यालयात विषाचा डब्बा घेऊन ते कार्यालयात पोहचला. आपल्या तक्रारी बाबत अनेकवेळा निवेदन कृषी अधिकारी यांना देऊनही त्यावर अद्याप तोडगा निघाला नाही परिणामी, अधिकारी केवळ वेळ काढू धोरण अवलंबित आहे. असे या शेतकऱ्याचा आरोप आहे. त्यातूनच या शेतकऱ्याने हे धाडसी पाऊल उचले आहे.

मात्र वेळीच हा प्रकार रोखून श्याम काळे यांची समजूत काढल्याने हा अनर्थ टळला आहे. या प्रकारामुळे मात्र काही काळ कृषी कार्यालयात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

हफ्ते रखडल्याने शेतकऱ्याचे टोकाचे पाऊल

हल्लीचा काळ शेतकऱ्यांच्या अनुषंगाने महत्वाचा काळ आहे. राज्यात मान्सूननं एंट्री केली असून शेतीच्या कामाला वेग आले आहे. अशातच पीएम किसान योजनेचा हफ्ता रखडल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. अशीच काहीशी परिस्थिती श्याम काळे यांची देखील आहे. वारंवार ऑफिसच्या चकरा मारून सुद्धा अधिकारी कर्मचारी दखल घेत नाही. तसेच सध्याच्या दुबार पेरणीच्या संकटामुळे ते हवालदिल झाले आहे. अधिकारी शेतकऱ्यांच्या भावना समजून घेत नाही. आर्थिक अडचणीत सापडलेले असताना पुढे हे आर्थिक संकट मोठ्या प्रमाणात ओढावेल, या भीतीने विष प्राशन करण्याचा निर्णय मी घेतला, अशी व्यथा शेतकऱ्याने यावेळी बोलताना मांडली. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी या शेतकऱ्याची समजूत काढली आणि या शेतकऱ्याला आश्वस्त केल्याने हे प्रकरण निवळले आहे.

तीन दिवसानंतर पावसाची हजेरी, शेतकरी सुखावला

मागील आठवड्यात झालेल्या दमदार पावसामुळे जिल्ह्यातील 30 टक्के शेतकऱ्यांनी कपाशी, सोयाबीन आणि तूरची लागवड केली होती. मात्र पावसाने उघड दिल्याने शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लागला होता. मात्र, मध्यरात्री आणि सकाळच्या सुमारास पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांवरील दुबार पेरणीचे संकट टळले आहे. तसेच नागरिकांची उकड्यापासून सुटका झालीय.

### राज्यातील लोकविरोधी महाभ्रष्टयुती सरकार विरोधात...

या योजनेत बदल करायचा असल्यास कॅबिनेटची मंजुरी लागते असे कृषी आयुक्तांनी निदर्शनास आणून दिले असता त्या कृषी आयुक्तांचीच बदली करण्यात आली. या योजनेतून ११ लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना लाभ झाला असता पण भाजपा सरकारने भ्रष्टाचार करुन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली. केंद्र सरकारने काही पिकांची एमएसपी वाढवली पण या वाढीचा महागाईशी तुलना केली असती अत्यंत तुटपुंजी वाढ आहे. महागाईच्या दराप्रमाणे ही एमएसपी वाढ नाही. डिझेल, खते, बियाणे, शेती साहित्यांच्या वाढलेल्या किमती पहाता शेतकऱ्यांच्या हाती काहीच लागत नाही. राज्यात प्रचंड दुष्काळ आहे, शेतकऱ्यांच्या फळबागा उद्ध्वस्थ झाल्या आहेत पण सरकार मात्र दुष्काळसदृष्य परिस्थीती आहे म्हणून शेतकऱ्यांची थट्टा करत आहे. शेतकऱ्यांच्या बांधांवर जाऊन काँग्रेसने शेतकऱ्यांना आधार दिला. NEET परीक्षा रद्द करा, पोलीस भरती पुढे ढकला. भाजपाच्या राज्यात सातत्याने पेपरफुटी होत आहे. नीट परिक्षेतही पेपरफुटला असल्याने ही परिक्षाच रद्द करण्याची मागणी काँग्रेस पक्षाने केली आहे. आधी पेपरफुटलाच नाही असे केंद्रीय मंत्र्यांनी जाहीर केले पण राहुल गांधी यींन पत्रकार परिषद घेतली तेंव्हा केंद्र सरकारला जाग आली. काँग्रेसने आज केलेल्या आंदोलनात नीट परीक्षा रद्द करावी अशी मागणीही केली आहे. तसेच राज्यात पाऊस सुरु असताना पोलीस भरती सुरु ठेवून भाजपा सरकार उमेदवारांच्या भवितव्याशी खेळत आहे. ही भरती पुढे ढकलावी अशी मागणी केली असतानाही सरकार त्याकडे लक्ष देत नाही असेही नाना पटोले म्हणाले.

जामनेरची घटना संताप आणणारी..

जामनेरमध्ये भिल्ल आदिवासी समाजातील सहा वर्षांच्या मुलीवर बलात्कार करुन तीची हत्या करण्यात आल्याने लोक संतप्त झाले. पोलीस स्टेशनवर हा समाज गेला असता शिंदे नावाच्या ठाणे अंमलदाराने या लोकांना हुसकावून लावले, मंत्र्याचा आशिर्वाद आहे मला कोणी काही करू शकत नाही असा उद्दामपणा केला. आता पोलीस या आदिवासी समाजालाच गोवण्याचा प्रयत्न करत आहे, असे नाना पटोले म्हणाले.

ईव्हीएमवर भाजपा उमेदवारांचाही आक्षेप..

ईव्हीएमवर जनतेचा विश्वास नाही त्यामुळे मतपत्रिकेवरच मतदान घ्यावे अशी मागणी देशभरातून केली जात आहे. पण भाजपा सरकार मात्र ईव्हीएमवरच निवडणूका घेत आहे. विरोधी पक्षांचेही ईव्हीएम वर आक्षेप आहेत पण आता भाजपाच्या उमेदवारांचाही ईव्हीएमवर विश्वास राहिलेला नाही. ईव्हीएमवर देशभरातून ८ उमेदवारांनी आक्षेप नोंदवला त्यात भाजपाचे तिघेजण आहेत. महाराष्ट्रातील डॉ. सुजय विखे पाटील हे भाजपाचे उमेदवार आहेत. आतातरी भाजपा, केंद्र सरकार व निवडणुक आयोगाने गांभीर्य ओळखावे व मतपत्रिकेवर मतदान घ्यावे असेही नाना पटोले म्हणाले. या पत्रकार परिषदेला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान उपस्थित होते.

### जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणूक लवकरच; २०...

तसेच २५ जुलैला प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील.

त्यानंतर मतदरांना ९ ऑगस्टपर्यंत हरकती घेता येतील. त्यानंतर २० ऑगस्टपर्यंत अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील, असं वृत्तात म्हटलं आहे. याबरोबरच महाराष्ट्र, झारखंड आणि हरियाणा या राज्यांच्याही मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना मतदार याद्या अद्ययावत करण्यासाठी पत्र देण्यात आले असल्याची माहिती सांगण्यात येत आहे. त्यामुळे आता निवडणूक आयोग चार राज्यांतील निवडणुकांच्या तारखा लवकरच जाहीर करण्याची शक्यता आहे.

### ओबीसींचं शिष्टमंडळ घेणार मुख्यमंत्र्यांची भेट...

सरकार सकारात्मक, कायम पाठीशी : छगन भुजबळ, पंकजा मुंडे, गोपीचंद पडळकर, धनंजय मुंडे, विजय वडेट्टीवार, प्रकाश शेंडगे, महादेव जानकर या नेत्यांचा या शिष्टमंडळामध्ये समावेश आहे. लक्ष्मण हाके यांच्या ४ समर्थकांचा सुद्धा या शिष्टमंडळात समावेश असणार आहे. सरकारी शिष्टमंडळ लक्ष्मण हाके तसंच उपोषणकर्त्यांना भेटल्यानंतर बोलताना मंत्री गिरीश महाजन म्हणाले, "हाके यांनी केलेल्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक असून यातून मार्ग काढण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. विशेष म्हणजे आम्हाला लक्ष्मण हाके यांच्या तब्येतीची काळजी असून याबाबत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा केली आहे, सरकार तुमच्या पाठीशी आहे." कायद्याच्या चौकटीत प्रश्न सोडवायचे आहेत : ओबीसी शिष्टमंडळाच्या मुख्यमंत्र्यांसोबत होणाऱ्या बैठकीबाबत बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "दोन समाजामध्ये तेढ निर्माण होऊ नये असं आम्हाला वाटतं. एखाद्या समाजाला असं वाटतं की, आमचं काहीतरी अहित केलं जाणार आहे. पण मी तुम्हाला सांगू इच्छितो की, असं काही करण्याची सरकारची कुठलीही मानसिकता नाही. आम्हाला सगळ्यांना सोबत घेऊन जायचंय आणि सगळ्यांचे प्रश्न सोडवायचे आहेत. हे प्रश्न सोडवताना ते कायद्याच्या चौकटीत सोडवायचे आहेत, तसाच प्रयत्न राज्य सरकारचा असणार आहे.

### विरारमध्ये झाड पडून महिलेचा मृत्यू, दोन दिवसांनी आढळला बेपत्ता...

तिचा शोध घेत असताना पोलिसांना ती बोळींज येथे फुले तोडण्यासाठी जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी त्या परिसरात शोध घेतला असता चिंचेचे मोठे झाड पडलेले दिसले. तेथे शोध घेत असता दुर्गंधी आली. तेव्हा झाड बाजूला केले असता मंजुळा झा यांचा मृतदेह आढळून आला. बुधवारी सकाळी वादळी पावासमुळे हे झाड पडले होते. आम्ही एनडीआरएफच्या मदतीने झाड बाजूला करण्याचे काम सुरू होते. मात्र झाडाच्या प्रचंड फांद्या असल्याने महिला दिसून आली नाही. स्थानिकांनीही झाडाखाली कुणी नसावे असे सांगितले होते, अशी माहिती वसई विरार अग्निशमन विभागाचे प्रमुख दिलीप पालव यांनी दिली.

### मुख्यमंत्री आणि गणेश नाईक विसंवाद मिटता मिटेना...

त्यावेळेस नाईक कुटुंबियांसह त्यांच्या समर्थकांनी नाराजी व्यक्त केली होती.

लोकसभा निवडणुकीनंतर हा वाद शमेल, अशी शक्यता वर्तवली जात होती. पण, वाद मिटता मिटत नसल्याचे पुन्हा एकदा दिसून आले आहे.

कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत भाजपने निरंजन डावखरे यांना उमेदवारी दिली आहे. डावखरे यांच्या प्रचारासाठी गेल्या आठवड्यात ठाण्यामध्ये महायुतीचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यासाठी नवी मुंबईतून ठाण्यात आलेले गणेश नाईक यांनी एक विधान केले होते. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असले तरीही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच आमचे नेते आहेत, असे विधान गणेश नाईक यांनी केले होते. त्याचीच चर्चा गेल्या आठ दिवसांपासून महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या चवीने चर्चिली जात आहे.

# लढाऊ बाण्याची रणरागिणी : अणावकर मोहिनी !

मोहिनी रघुवीर अणावकर ! अर्थात ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते रघुवीर उर्फ बाबा अणावकर यांची ही लेक खऱ्याअर्थाने समाजवादी नेत्या मृणालताई गोरे यांची राजकीय वारसदार म्हणावी लागेल. घर हक्क समितीचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या मोहिनी अणावकर या आधीच्या समाजवादी पक्ष मग जनता पक्षाचे आणि नंतरच्या जनता दल धर्मनिरपेक्षचे ज्येष्ठ नेते आणि माजी रोजगार मंत्री निहालभाई अहमद हे जेंव्हा महाराष्ट्र प्रदेश जनता दलाचे अध्यक्ष होते तेंव्हा काही काळ स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत होत्या. दीनदलित, गोरगरिबांच्या आणि झोपडपट्टीवासियांना न्याय मिळवून देण्यासाठी मोहिनीताई अहोरात्र परिश्रम घेत असतात. गोरेगांव येथील अनेक सामाजिक संस्थांशी त्यांचा घनिष्ट संबंध आहे. विशेषतः झोपडपट्टीवासियांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी त्या आकाशपाताळ एक करायला मागेपुढे पहात नाहीत. संस्थांची सर्वसाधारण सभा असेल आणि त्यात जर मोहिनी अणावकर सहभागी असतील मग ती सर्वसाधारण सभा गाजलीच म्हणून समजा. संस्थेची घटना, कायदे, नियम हे तंतोतंत पाळण्याकडे मोहिनी अणावकर यांचा कटाक्ष असतो. आपल्या वृद्ध मातोश्रीं समवेत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाच्या इमारतीत त्या रहायला आल्या. १ नोव्हेंबर २०१९ रोजी वयाच्या ९० व्या वर्षी मोहिनी अणावकर यांच्या मातोश्री रत्नाबाई रघुवीर अणावकर यांचे दुःखद निधन झाले. पितृछत्रानंतर मोहिनीताईंचे मातृछत्रही हरपले. आई वडिलांनी घालून दिलेल्या मार्गावर त्या अविरत, भक्कमपणे मार्गक्रमण करीत आहेत.



वीस वीस, बावीस बावीस मजल्यांच्या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना कोणकोणत्या संकटांचा सामना करावा लागतो, याचा त्या दररोज अनुभव घेत असतात. कधी पाणी येतं, कधी नाही, इमारतीत उद्वाहन(लिफ्ट) कधी सुरु असते तर कधी बंद. बंद असली की वीस वीस मजले चढ उतर करणे, वीज नसली की मग रहिवाशांचे हाल विचारुच नका. या इमारतीच्या रहिवाशांना हाल अपेष्टांमधून मुक्ती मिळावी म्हणून मोहिनी अणावकर यांची सतत धडपड सुरु असते. आज शिवसेना जितक्या वर्षांची झाली आहे तितक्याच वयाच्या मोहिनी अणावकर आहेत. शिवसेना आणि मोहिनीताई यांच्यामध्ये केवळ तीनच दिवसांचे अंतर आहे. समाजवादी चळवळीत काम करणाऱ्या मोहिनी अणावकर यांनी आपल्या पक्षात येऊन आपल्या पक्षामार्फत राजकीय वाटचाल करावी, यासाठी अनेक नेते प्रयत्नशील आहेत. पण स्वत:ला कोणत्याही राजकीय पक्षाच्या बंधनात अडकवून न घेता आपल्या मनाला पटेल त्या पद्धतीने त्या कार्यरत आहेत. मग प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी असेल किंवा बीडच्या उपरेकांचा सत्यशोधक समाज असेल किंवा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या कार्यकर्त्यांसमवेत कोणताही कार्यक्रम असेल मोहिनी अणावकर या अहमहमिकेने पुढेच दिसतील. दूरदर्शनवरुनही त्यांनी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना, महिला कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले आहे. रेखाताई बोऱ्हाडे यांच्या स्त्री सन्मान संस्थेला ही त्यांचे मार्गदर्शन लाभले आहे. जागतिक महिला दिन असो की डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महानिर्वाण दिन, सावित्रीबाई फुले जयंती अशा विविध कार्यक्रमात त्यांचे कार्यक्रम ठरलेले असतात. चळवळीतील प्रत्येक संस्था, संघटना यांच्या मध्ये त्यांना बोलविण्यासाठी जणू स्पर्धा लागलेली असते. परखड भूमिका मांडणाऱ्या स्पष्ट वक्त्या म्हणून त्यांचा नांवलौकिक आहे. कुणीही अडलेल्या नाडल्या गेलेल्या व्यक्ती साठी पोलीस स्टेशनला धाव घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्या काळ वेळ पहात नाहीत. एखाद्या पीडित व्यक्तीने कधीही हाक मारली तर त्याच्या हाकेला त्या तत्परतेने धावून जातात. त्यांच्या या मदतीसाठी धावून जाण्याच्या स्वभावामुळे दीनदलित, पीडित, गोरगरिबांना त्या आपल्याच वाटतात. त्यांच्या सामाजिक कार्याची



दखल घेऊन परळच्या एका संस्थेने त्यांना स्व. मीनाताई ठाकरे पुरस्कार देऊन त्यांचा बहुमान केला. तथाकथित समाजवादाचा बुरखा पांघरण्याऐवजी आपल्याला जे पटेल तेच करणाऱ्या मोहिनी अणावकर या शेगांवच्या संतश्रेष्ठ श्रीगजानन महाराज यांच्या निस्सीम भक्त असून शेगांवची वारी त्या चुकवत नाहीत. श्री गुरुचरित्र , श्री गजानन विजय ग्रंथाची पारायणे त्या न चुकता करतात, हे सांगितले तर अनेकांचे डोळे फिरतील/विस्फारतील. आप्तस्वकीय मंडळींची विचारपूस, नातलगांची, मित्रमंडळींची शुश्रुषा ही महत्त्वाची. आपल्या चळवळीत काम करणाऱ्यांपैकी एखादी व्यक्ती आजारी आहे, असे कळायचा अवकाश मोहिनीताईंची स्वारी त्या त्या ठिकाणी, त्या त्या हॉस्पिटलमध्ये, रुग्णालयात हजर झाल्याच म्हणून समजा. अनेक कार्यकर्त्यांना त्यांनी आधार मिळवून दिला आहे. स्वतःला कोरोना होऊनही त्यावर त्यांनी मात केली आणि पुन्हा कंबर कसून कामाला लागल्या आहेत. आपल्या परिवारातील अनेक जण विविध प्रकारच्या अडचणीत आले अशा सर्वांसाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. मुंबई पासून गोव्यापर्यंत तसेच अणाव या आपल्या मूळ गावी आपापल्या प्रत्येक नातेवाईकाकडे देखभाल, शुश्रुषा या कामांसाठी मोहिनीताईंची फेरी ठरलेली असते. त्यामुळे मोहिनी उर्फ शुश्रुषा हेच या रणरागिणी चे नांव या काळात सर्वतोमुखी झाले असल्यास नवल वाटू नये. काही वर्षांपूर्वी गांधीनगर दौऱ्यावर असतांना मोहिनीताईंचा भीषण अपघात झाला. त्या ज्या मोटारीत होत्या ती मोटार दुरुस्तीसाठी जिथे नेण्यात आली त्यांनी या मोटारीतल्या व्यक्ती जीवंत असल्याचे पाहून आश्चर्य व्यक्त केले. मोहिनीताई जबरदस्त जखमी झाल्या. इतक्या की त्यांना स्ट्रेचर वरुन मुंबई येथे आणावे लागले. आपण गंभीर जखमी झाल्याचे आईला, भावाला समजले तर ते अतीशय चिंता करतील आणि स्वतः ची तब्येत बिघडवून घेतील, या विचाराने त्यांनी गांधीनगर येथील इस्पितळातून थेट मला फोन करुन, " गुरुजी, मी मोठ्या अपघातातून वाचली आहे. गांधीनगर येथून रेल्वेने मुंबई येथे येत आहे. बोरीवली येथे अँब्युलन्स आणू शकाल काय ?" असे सांगितले. मी आणि रेखाताई बोऱ्हाडे पहाटे पहाटे अँब्युलन्स घेऊन बोरीवली स्थानकात पोहोचलो. गाडीतून उतरवून घेत त्यांना थेट स्ट्रेचरवरुनच गोरेगांव येथील घरी सोडले. वैद्यकीय अधिकारी सोबतच होते. कमरेला पट्टा कटाक्षाने लावायला सांगितले होते. त्यातून त्या ठणठणीत बऱ्या झाल्या. मातोश्री रत्नाबाईंच्या निधनानंतर मी आणि रेखाताई मोहिनीताईंना भेटायला गेलो तेंव्हा त्यांनी हे माझे दोन हात आहेत, अशा शब्दांत आमची नातलगांना ओळख करुन दिली. गेल्या काही वर्षांत प्रचंड धावपळ करुन सर्वच आघाड्यांवर त्यांनी परिश्रमपूर्वक जबाबदारी सांभाळली आहे. निहालभाई अहमद सारख्या सर्वात मोठ्या नेत्यासमवेत राहूनही त्यांनी कधीही गैरफायदा घेतला नाही, यातच त्यांची सामाजिक, निष्कलंक कार्यकर्ता ही ओळख पटू शकते. अशा या गोरेगांवच्या रणरागिणी, घर हक्क संघटनेच्या अध्यक्षा मोहिनी अणावकर यांना दीनदलित, पीडित, शोषित, गोरगरिबांच्या सेवेसाठी उदंड आयुष्य आणि ठणठणीत आरोग्य प्राप्त होवो, या मनापासून शुभेच्छा !

**- योगेश वसंत त्रिवेदी**
(yogeshtrivedi55@gmail.com)

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# नरेंद्र मोदी गाझा पट्टीतील युद्ध थांबवू शकतात, पण पेपरफुटी मात्र थांबवू शकत नाहीत: नाना पटोले

## कोकण पदवीधर मतदारसंघातील मविआचे उमेदवार रमेश कीर यांच्या प्रचारार्थ ठाण्यात कार्यकर्त्यांचा मेळावा

● ठाणे - भारतीय जनता पक्षाने लोकसभेची निवडणूक षडयंत्र करून जिंकली आहे. बॅलेट पेपरवरच निवडणुका झाल्या पाहिजेत ही जनतेची मागणी आहे, जनतेचा ईव्हीएम वर विश्वास नाही त्यासाठी देशभरात आंदोलने झाली. अमेरिका, जपानसारखे जगातील अनेक प्रगत देश बॅलेट पेपरवर निवडणुका लढवतात पण भारतातच ईव्हीएम कशासाठी वापरली जात आहे. लोकसभा निवडणुकीत धनशक्तीचा मोठ्या प्रमाणात वापर केला गेला, प्रशासनाला हाताशी धरून षडयंत्र करून भाजपाने जागा जिंकल्या आहेत. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा कोकणात झालेल्या पराभवाचा पदवीधर निवडणूकीत बदला घ्या, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे





अध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे. कोकण पदवीधर मतदारसंघातील मविआचे उमेदवार रमेश कीर यांच्या प्रचारार्थ ठाणे येथे आयोजित कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलत होते. ते पुढे म्हणाले की, विधान परिषदेची निवडणूक एकजुटीने लढून जिंकू आणि विरोधकांची हवा काढून घेऊ. या निवडणुकीत महायुतीचा फुगा सुशिक्षितांनी फोडला तर आगामी निवडणुकीत त्याचा परिणाम दिसेल म्हणून ही निवडणूक वेगळी आहे. मुंबईतील दोन जागा, नाशिक व कोकण या चारही मतदार संघात महाविकास आघाडी एकदिलाने निवडणूक लढत आहे. या निवडणुकीत धनशक्तीच्या विरोधात जनशक्तीच्या उमेदवाराला निवडून द्यावे, असे आवाहन नाना पटोले यांनी केले आहे.

राज्यात बेरोजगारीची संख्या मोठी आहे पण सरकार मात्र नोकर भरती करत नाही. महाराष्ट्र हे बेरोजगारांचे राज्य झाले आहे. गाझा मध्ये सुरु असलेले युद्ध पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी थांबवले असा दावा करतात पण देशातील पेपरफुटी मात्र मोदी थांबवू शकत नाहीत. नीट परिक्षेतील पेपरफुटीमुळे लाखो मुलांचे भवितव्य अंधारात नेण्याचे पाप भाजपा सरकारने केले आहे असे नाना पटोले म्हणाले.

यावेळी प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान म्हणाले की, पदविधरांची समस्या माहित असलेल्या, कोकणातील पदविधरांच्या समस्या माहिती असलेल्या व्यक्तीलाच या पदावर निवडून दिले पाहिजे म्हणूनच महाविकास आघाडीने पदविधरांच्या समस्या माहिती असलेल्या रमेश कीर यांना उमेदवारी दिली आहे. कोकण पदवीधर मतदारसंघातील २.२५ लाख मतदारांपैकी जवळपास १.७५ लाख मतदारांची नोंदणी मविआने केली आहे. सर्वांनी एकदिलाने काम करावे व मुंबई, नाशिक कोकण मतदारसंघातील चारही उमेदवारांना बहुमताने विजयी करा असे आवाहन केले.

या मेळाव्याला प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष व माजी मंत्री नसीम खान, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड, माजी खासदार राजन विचारे, प्रदेश सरचिटणीस राजेश शर्मा, ठाणे काँग्रेस शहराध्यक्ष विक्रांत चव्हाण, ठाणे ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दयानंद चोरगे, राजन विचारे, ज्योती ठाकरे, वैशाली दरेकर, गजानन देसाई यांच्यासह महाविकास आघाडीतील मित्रपक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पेंढारकर कॉलेज वाचविण्यासाठी शिक्षक, माजी विद्यार्थ्यांचे अर्ध नग्न आंदोलन

● कल्याण : पेंढारकर कॉलेज प्रशासनाच्या मनमानी कारभाराविरोधात पेंढारकर कॉलेज बचाव समितीच्या माध्यमातून पेंढारकर कॉलेज डोंबिवली जे मूळ अनुदानित आहे, ते विनानुदानित करण्याचा कॉलेज प्रशासनाचा कट आहे. या विरोधात पेंढारकर कॉलेज बचाव समिती तर्फे साखळी उपोषण आंदोलन सुरू आहे. आज या आंदोलनाच्या आठव्या दिवशी आंदोलनकर्त्यांनी अर्ध नग्न होत आंदोलन करत कॉलेज प्रशासनाचा निषेध व्यक्त केला.

के. व्ही. पेंढारकर कॉलेज विनाअनुदानित करण्याचा व्यवस्थापनाचा प्रयत्न तसेच जुनिअर आणि डिग्री कॉलेजच्या प्राध्यापकांसह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना काम न देता वर्गात बसवून ठेवण्याच्या कथित मनमानी कारभाराविरोधात 'सेव्ह पेंढारकर कॉलेज' असा नारा देत गेल्या आठ दिवसां पासून कॉलेजच्या समोर माजी विद्यार्थीनी साखळी उपोषण सुरू केले.

तर आंदोलनात सहभाग घेतलेल्या शिक्षकांनी हे कॉलेज अनुदानित आहे, ते विनाअनुदानित करण्याचा घाट घातला आहे. त्याला सरकारची मान्यता नाही, मान्यता नसताना तसेच प्रकरण न्यायप्रविष्ट असताना प्रशासनाकडून विनाअनुदानित प्रक्रिया राबविणे सुरू आहे. अनुदानित ज्युनिअर आणि डिग्री कॉलेजच्या प्राध्यापकांसह शिक्षकेतर कर्मचारी वर्गास काम न देता एका



खोलीत बसविण्याचा प्रकार अन्यायकारक आहे. यामुळे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक भरडले जाणार आहेत, कॉलेज विनाअनुदानित झाल्यावर शैक्षणिक फीमध्ये सवलत असलेल्या विद्यार्थ्यांना संपूर्ण फी भरावी लागेल. त्याचा भुर्दंड पालकांना बसेल, त्यामुळे कॉलेजच्या मनमानीविरोधात साखळी उपोषण सुरू करण्यात आल्याचे सांगितले.

तर आज हे अर्धनग्न होण्याची वेळ प्रशासनाने आमच्यावर आणली आहे. 2012 पासून डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाविरुद्ध शेकडो पुरावे दिले गेले, शेकडो समित्या नेमल्या गेल्या, शेकडो आदेश दिले गेले, तरी देखील डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळावर असलेल्या वरदहस्तामुळे त्यांच्यावर कारवाई होत नसून त्याविरोधात उपोषणाला बसलो आहोत. पेंढारकर कॉलेजचे खाजगीकरण झाल्यास या धर्तीवर महाराष्ट्रातील इतर सर्व अनुदानित कॉलेज विनाअनुदानित होतील.

# ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

● ठाणे - आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे व प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या वतीने जिल्हा नियोजन भवनमधील सभागृहात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी योग अभ्यास वर्ग घेण्यात आला.

उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) गोपीनाथ ठोंबरे, उपजिल्हाधिकारी दीपक चव्हाण, तहसीलदार संजय भोसले, माहिती अधिकारी नंदकुमार




ब. वाघमारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. अनिता जवंजाळ यांच्यासह अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी प्रजापिता ब्रह्माकुमारी विद्यालयाच्या ब्रह्माकुमारी रेखा दीदी, ब्रह्माकुमारी सविता बहन यांनी योगा प्रात्यक्षिक व ध्यानधारणेचे प्रात्यक्षिक करून घेतले. यावेळी ब्रह्माकुमारी मिना दीदी, ब्रह्माकुमारी बिंदिया बहन, व ब्रह्माकुमार नितीन भाई यांनीही संयोजन केले.

# आज नामवंत व्याख्याते, संपादक अभिजीत कांबळे यांचे 'राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या शैक्षणिक विचारांची दूरदृष्टी' विषयावर व्याख्यान

● नवी मुंबई - महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रातील विकासात महत्वपूर्ण योगदान असणा-या राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात छत्रपती शाहू महाराजांच्या प्रेरणादायी कार्याला उजाळा देण्यासाठी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे. राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या 26 मे रोजीच्या 150 व्या जयंती दिनाच्या औचित्याने शनिवार दि. 22 जून 2024 रोजी, सायं 6.30 वा., वर्तमानपत्रे, वृत्तवाहिन्या तसेच डिजीटल अशा तिन्ही प्रसार माध्यमांमध्ये वीसहून अधिक वर्षांचा पत्रकारितेचा अनुभव असलेले व सध्या बीबीसी मराठीचे संपादकपद भूषविणारे संपादक, व्याख्याते श्री. अभिजीत कांबळे यांचे 'राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या शैक्षणिक विचारांची दूरदृष्टी' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे.शिक्षण हेच माणसाच्या प्रगतीचे प्रमुख साधन आहे हे ओळखून छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षण प्रसारावर विशेष भर दिला. त्यासाठी त्यांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्रियांच्या शिक्षणाकडेही




प्राधान्याने लक्ष दिले. शिक्षणाचे महत्व ओळखून त्याकाळी ठोस भूमिका घेत त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणा-या राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या दूरदृष्टीच्या शैक्षणिक विचारांना या निमित्ताने उजाळा मिळणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सेक्टर 15, ऐरोली येथे उभारण्यात आलेले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक हे बाबासाहेबांच्या 'ज्ञान हीच शक्ती' या विचारसूत्रावर आधारित 'ज्ञानस्मारक' म्हणून येथे भेट देणा-या विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व नागरिकांनी नावाजले आहे. याठिकाणी 'विचारवेध' शृंखलेंतर्गत नियमित आयोजित करण्यात येत असलेल्या मान्यवर वक्त्यांच्या व्याख्यानांतून श्रोत्यांना वैचारिक मेजवानी उपलब्ध करुन दिली जात आहे. या व्याख्यानांना नागरिकांचा नेहमीच उत्तम प्रतिसाद लाभलेला आहे. आधुनिक विज्ञाननिष्ठ समाजक्रांतीचे उद्गाते म्हणून मानांकित राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या सर्वस्पर्शी कार्याला अभिवादन करण्यासाठी व त्यांचे अतुलनीय कार्य जाणून घेण्यासाठी शनिवार, दि. 22 जून 2024 रोजी, ऐरोली मुलुंड खाडी पुलाजवळ, सेक्टर 15, ऐरोली येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृहात सायं. 6.30 वा. आयोजित करण्यात आलेल्या नामवंत व्याख्याते व संपादक श्री. अभिजीत कांबळे यांच्या 'राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या शैक्षणिक विचारांची दूरदृष्टी' या व्याख्यानाप्रसंगी नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# स्वामी विवेकानंद विद्यामंदिर विष्णूनगर शाळेत योगदिन उत्साहात संपन्न

● ठाणे - शुक्रवार दिनांक 21 जून 2024 रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग विद्याधाम डोंबिवलीच्या सौ.राधिका केतकर व त्यांचे सहकारी सौ.सुनीता रत्नाकर, मनिषा फाटक व अपूर्वा चिपळूणकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. इयत्ता पाचवी ते सातवीच्या प्रत्येक वर्गातील दहा-दहा विद्यार्थी असे निवडक विद्यार्थी निवडून, प्रथम दोन दिवस स्वामी विवेकानंद विद्यामंदिर दत्तनगर शाळेची माजी विद्यार्थीनी कु. पूर्वा मुसळे हीच्या मार्गदर्शनाखाली दोन दिवस विद्यार्थ्यांची वेगवेगळी



आसने व प्राणायाम सराव घेण्यात आला.आज आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांना उत्कृष्ट अशी आसने व प्राणायाम करून विविध प्रात्यक्षिके केली. विद्यार्थ्यांसोबतच सहकारी शिक्षक व शिक्षिकाही ही योग विद्या अभ्यासात सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सौ.राधिका केतकर यांनी ,अगदी कमी वेळात सराव करून चांगले प्रात्यक्षिक केल्याबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

ज्याप्रमाणे आपण विषयांचा अभ्यास करतो त्याच्यातून आपण विद्या मिळवतो. अगदी त्याचप्रमाणे योग विद्या अभ्यास करणे देखील महत्त्वाचे आहे असे त्यांनी नमूद केले. शिक्षकांशी व विद्यार्थ्यांशी संवाद साधताना योगा ला जातो असे न म्हणता योग विद्या अभ्यासासाठी मी जात आहे असे म्हणावे. कौटिल्यसन व कमलासन या कठीण आसनाची त्यांनी प्रात्यक्षिके करून दाखवली. वयाच्या 63 व्या वर्षी देखील आपण सर्वांग सुंदर योग करू शकतो ह्याची जाणीव सर्वांना राधिका केतकर यांचे योग प्रात्यक्षिक पाहिल्यानंतर झाली.

इयत्ता पहिली दुसरीच्या विद्यार्थ्यांनी व इतर वर्गातल्या विद्यार्थ्यांनी वर्गातच ध्यानधारणा व प्राणायाम केले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना लाइव प्रोजेक्टर द्वारे विविध योग आसने दाखवण्यात आले व करून घेण्यात आली. सदर कार्यक्रमाला शाळा समिती सदस्य दांडेकर सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अहिरे सर यांनी केले. आभार प्रदर्शन सौ . प्रेरणा पाटील यांनी केले.

या संपूर्ण कार्यक्रमास मुख्याध्यापिका सौ.भावना राठोड यांचे मार्गदर्शन लाभले .

# आंतरराष्ट्रीय योगदिन राहनाळ शाळेत उत्साहाने संपन्न

● कल्याण : जागतिक स्तरावर योगाला विशेष असं महत्त्व आलेलं असून योगामुळे माणसाची पॉझिटिव्हिटी वाढते. निरोगी आयुष्य जगता येते. विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती विकसित होऊन विद्यार्थ्यांचा अभ्यास अतिशय चांगल्या पद्धतीने होतो. असे उद्गार राहनाळ ग्रामपंचायतच्या सरपंच प्रियांका पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना काढले.

जिल्हा परिषद शाळा राहनाळ येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी योग प्रात्यक्षिके केली. यावेळी राहनाळ ग्रामपंचायतच्या सरपंच प्रियांका



पाटील, वरिष्ठ लिपिक प्रवीण पाटील, विश्राम नाईक, केतन माळी, आकाश पाटील, गौरव पाठारे व ग्रामपंचायतींचे कर्मचारी उपस्थित होते. योगाने माणसाला दैनंदिन जीवन अत्यंत सुसाह्यपणे जगता येते. २०१५ पासून योगाला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झाला आहे. योग ही भारताने जगाला दिलेली एक मोठे देणगी आहे. असे शाळेचे मुख्याध्यापक अजय पाटील यांनी सांगितले.

शिक्षक अंकुश ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी योगाची प्रात्यक्षिके केली.

# महायुती सरकारविरोधात कल्याणात काँग्रेसचे चिखलफेक आंदोलन




● कल्याण : महापुरुषांचा अपमान , जाती धर्मात तेढ, पेपरफुटी आदी मुद्द्यांविरोधात कल्याणातही काँग्रेस पक्षातर्फे चिखलफेक आंदोलन करण्यात आले. यावेळी राज्य सरकार आणि केंद्र सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

महापुरुषांचा सतत अपमान, जाती-धर्मात तेढ निर्माण करून सामाजिक स्वास्थ सतत खराब करणे, औद्योगिक विकासाला खिळ, पेपर फुटीचे ग्रहण, NEET चा गोंधळ घालून लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान, बेरोजगारी, शेतकऱ्यांची उपेक्षा, गुन्हेगारीत वाढ, अशा एक ना अनेक कारणाने महाराष्ट्र अधोगतीला घेऊन जाण्याचं काम सध्याचे असंवेदनशील भाजपा पुरस्कृत सरकार करत असल्याची टीका जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी यावेळी केली.

तसेच या प्रश्नी राज्य सरकारचा विरोध म्हणून यावेळी काँग्रेस पक्षातर्फे महायुती सरकारच्या प्रातिनिधिक पुतळयावर चिखलफेक करून निषेध व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनात जिल्हाध्यक्ष सचिन पोटे, प्रदेश काँग्रेस सदस्य मुन्ना तिवारी, महिला जिल्हाध्यक्ष कांचन कुलकर्णी, ब्लॉक अध्यक्ष विमल ठक्कर, प्रवीण साळवे, शकील खान यांच्यासह विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# केडीएमसीच्या वॉर्ड ऑफिसरांच्या बदल्या

## नगर रचना विभागातील वर्षानुवर्षे खुर्चीला चीटकुन बसलेल्या कनिष्ठ अभियंता बदल्याचा प्रशासनाला विसर

● कल्याण : कल्याण डोंबिवली महानगर पालिकेतील प्रभाग क्षेत्र कार्यालयाच्या काही प्रभाग क्षेत्र अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या तर काही अधिकाऱ्याच्या या प्रभागातून त्या प्रभागात बदली करण्यात आले असून प्रभागातील विस्कळीत घडी सावरण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने बदली सत्राचा मार्ग अवलंबला आहे. मात्र दुसरीकडे वर्षानुवर्षे नगर रचना विभागात खुर्चीला चिटकुन बसलेल्या कनिष्ठ अभियंत्याच्या बदल्या करण्यास प्रशासन प्रभाग क्षेत्र कार्यालयाच्या अधिकाऱ्याच्या बदल्यांसाठी जेवढी उत्सुकता दाखवत असतात तेव्हढी नगर रचना विभागातील कनिष्ठ अभियंता बदल्या करण्यास कार्यतत्परता का दाखवत नाही असा सवाल या बदली सत्रा मुळे पालिका वर्तुळात चर्चिला जात आहे.

कल्याण डोंबिवली महानगर पालिकेतील दहा प्रभागातील प्रभाग क्षेत्र अधिकाऱ्याच्या बदल्यांची ऑर्डर सामान्य प्रशासना कडून काढण्यात आली.




तत्कालीन प्रभारी सहा.आयुक्त तथा प्रभागाचे प्रभाग क्षेत्र अधिकारी असलेले अ प्रभाग क्षेत्र अधिकारी किशोर खुताडे यांची उचल बांगडी करून त्याच्या जागी निवडणूक व जनगणना विभागाचे सहा. आयुक्त संदीप रोकडे याची वर्णी लावली, क प्रभागाचे क्षेत्र अधिकारी संजय साबळे यांची उचल बांगडी करून त्याच्या जागी सहा आयुक्त तथा जाहिरात व होर्डिंगआणि कर कल्याण विभागाचे तुषार सोनावणे यांची पुन्हा क प्रभाग क्षेत्र अधिकारी पदावर नियुक्ती केली तसेच त्यांच्या कडे अतिरिक्त कार्यभार सहा.आयुक्त मालमत्ता विभागाचा कार्यभार सोपवला आहे.

ई प्रभाग क्षेत्र अधिकारी भारत पवार यांची बदली करून त्याच्याकडे फ प्रभाग क्षेत्र अधिकारी पद, तर फ प्रभाग क्षेत्र अधिकारी चंद्रकांत जगताप यांची बदली करून त्याच्याकडे ई प्रभाग क्षेत्र प्रभाग अधिकार पदी तर आय प्रभाग क्षेत्र अधिकारी हेमा मुंबरकर यांची बदली करून त्याच्या जागी किशोर ठाकुर यांची प्रभाग क्षेत्र अधिकारी म्हणून नियुक्ती केली तर हेमा मुंबरकर यांच्या कडे प्र.सहा आयुक्त परिमंडळ २ ची जबाबदारी सोपविली आहे.

सहा. आयुक्त स्नेहा करपे यांच्या कडील सहा.आयुक्त परि.२ चां पदभार काढून घेत पूर्वी असलेला क्रीडा सांस्कृतिक विभागासह सहा.आयुक्त कर विभाचा पदभार सोपवला आहे .पालिका सामान्य प्रशासन विभागाने कार्य तत्परता दाखवीत पालिकेच्या पाच प्रभागातील प्रभाग अधिकाऱ्याच्या बदली सत्र राबविले असेल तरी दुसरीकडे नगर रचना विभागातील वर्षानी वर्ष एकाच खुर्चीला गुळाच्या ढेपला मुंगळा चिकटल्या सारखे बसलेल्या कनिष्ठ अभियंता ,सहा.अभियंता,अभियंता याची बदली झाली तरी आर्थिक प्रसादा ची देवाण घेवान करून पाच सहा महिने बदली करून परत येणार्या मस्तवाल अधिकाऱ्यांच्या बदल्यां बाबत कोणताच कठोर निर्णय घेत नाही.

## पती ऑस्ट्रेलियात, तर पूजा सावंतने भारतात साजरी केली पहिली वटपौर्णिमा!



पतीच्या दीर्घायुष्यासाठी विवाहित महिला दरवर्षी वटपौर्णिमेचा सण साजरा करतात. वटपौर्णिमेच्या दिवशी स्त्रिया वडाच्या झाडाची विधिवत पूजा करून उपवास करतात. ज्येष्ठ महिन्यातील पौर्णिमेला ही वटपौर्णिमा साजरी केली जाते. मराठी कलाविश्वातील अनेक अभिनेत्रींची नवीन लग्न झाली आहेत. त्यामुळे यंदा पूजा सावंत, मुग्धा वैशंपायन, योगिता चव्हाण, शिवानी सुर्वे अशाच बऱ्याच अभिनेत्री लग्नानंतर त्यांची पहिली वटपौर्णिमा साजरा करणार आहेत.

अभिनेत्री पूजा सावंतने तिच्या पहिल्या वटपौर्णिमेची झलक इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे. पूजाचा नवरा कामानिमित्त ऑस्ट्रेलियात असतो हे आता सर्वश्रूत आहे. लग्नानंतर अभिनेत्री देखील आपल्या नवऱ्याबरोबर ऑस्ट्रेलियात गेली होती. याठिकाणी या दोघांनी गुढीपाडवा, होळी हे सण एकत्र साजरे केले होते. यानंतर पूजा एकटीच भारतात परतली होती. मुंबईत आल्यावर अभिनेत्रीने लग्नानंतर पुन्हा एकदा नव्या जोमाने कामाला सुरुवात केली होती.

आता पूजाचा नवरा जरी ऑस्ट्रेलियात असला तरीही अभिनेत्रीने तिची पहिली वटपौर्णिमा भारतात साजरी केली आहे. पूजाची बहीण रुचिराने 'बहिणीची पहिली वटपौर्णिमा' असं कॅप्शन देत अभिनेत्रीचे सुंदर फोटो इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केले आहेत. पूजाने अगदी पारंपरिक पद्धतीने लग्नानंतरची पहिली वटपौर्णिमा साजरी केली आहे. पारंपरिक अशा लूकमध्ये पूजा खूपच सुंदर दिसत होती.

वटपौर्णिमेच्या सणाला पूजाने पिवळ्या व त्याला लाल रंगाचा काठ असलेली सुंदर अशी साडी नेसली होती. यावर तिने एकच ठुशी घालून, गळयात सुंदर असं मोठं मंगळसूत्र घातलं होतं. नाकात नथ, हातात हिरवा चुडा... पूजाच्या या सुंदर लूकने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे.

## वेस्ट इंडिजच्या सुपर ८ फेरीत वाढल्या अडचणी, 'या' धडाकेबाज खेळाडूला झाली दुखापत

आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेतील सुपर ८ फेरीचे सामने सुरु झाले आहेत. पण विंडीज संघाला पहिल्याच सामन्यात पराभवाला सामोरे जावे लागले. वेस्ट इंडिजचा इंग्लंडविरुद्ध ८ विकेट्सने पराभव झाला. आता सुपर ८ मध्ये वेस्ट इंडिजला पुढील सामने दक्षिण आफ्रिका आणि अमेरिकेविरुद्ध खेळायचे आहेत. त्याचबरोबर उपांत्य फेरी गाठण्यासाठी दोन्ही सामने कोणत्याही किंमतीला जिंकावे लागतील. पण याआधीच वेस्ट इंडिजसाठी एक वाईट बातमी समोर आली आहे.




स्टार फलंदाज ब्रँडन किंगला दुखापत –

इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात वेस्ट इंडिजचा सलामीवीर फलंदाज ब्रँडन किंगला दुखापत झाल्यामुळे रिटायर्ड हर्ट व्हावे लागले होते. पाचव्या षटकात सॅम करनचा एक चेंडू लागल्याने तो वेदनेने कोसळला. यानंतर तो मैदानाबाहेर गेला. त्याने सामन्यात १२ चेंडूत २३ धावा केल्या होत्या आणि तो चांगल्या फॉर्ममध्ये दिसत होता. मात्र दुखापतीमुळे त्याला मैदान सोडावे लागले. आता क्रिकेट वेस्ट इंडिजने त्यांच्या निवेदनात पुष्टी केली आहे की त्याला साइड स्ट्रेनचा त्रास होत आहे.

बरे होण्यासाठी एक आठवडा लागू शकतो –

ब्रँडन किंगला झालेली साइड स्ट्रेनची दुखापत बरी होण्यासाठी एका आठवड्यापेक्षा जास्त वेळ लागतो. ब्रँडन किंगची दुखापत बरी न झाल्यास २०२४ च्या टी-२० विश्वचषकातील उर्वरित सामने खेळणे त्याच्यासाठी कठीण होईल. जर तो सावरला नाही तर वेस्ट इंडिजकडे आंद्रे फ्लेचर, काइल मेयर्स, फॅबियन ॲलन, हेडन वॉल्श जूनियर आणि मॅथ्यू फोर्ड यांच्या रूपाने पाच राखीव खेळाडू आहेत. यापैकी कोणालाही संधी मिळू शकते. वेस्ट इंडिजचा कर्णधार रोव्हमन पॉवेल काय म्हणाला?

वेस्ट इंडिजचा कर्णधार रोव्हमन पॉवेल म्हणाला की होय, थोडी चिंता आहे पण आशा आहे की तो पुढील सामन्यात चांगली कामगिरी करू शकेल. तो आमच्यासाठी किती महत्त्वाचा खेळाडू आहे हे आम्हाला माहीत आहे. वेस्ट इंडिजने ग्रुप स्टेजमध्ये चांगली कामगिरी केली होती आणि सलग चार सामने जिंकून सुपर ८ मध्ये स्थान पक्के केले होते. मात्र सुपर ८ च्या पहिल्याच सामन्यात संघाला पराभवाला सामोरे जावे लागले. २०१२ आणि २०१६ मध्ये वेस्ट इंडिजने टी-२० विश्वचषक जिंकला आहे.

## प्रथमेश परब पोहोचला कोकणात!



'टाईमपास', 'टकाटक', 'बालक पालक', 'डिलिव्हरी बॉय' अशा चित्रपटांमधून अभिनेता प्रथमेश परब घराघरांत लोकप्रिय झाला. 'टाईमपास' चित्रपटामुळे आजही त्याला काही लोक 'दगडू' म्हणून ओळखतात. काही महिन्यांपूर्वीच प्रथमेशला त्याच्या खऱ्या आयुष्यातली 'प्राजू' भेटली. प्रथमेश आणि क्षितिजा यांचा लग्नसोहळा २४ फेब्रुवारीला थाटामाटात पार पडला होता. लग्नानंतर अभिनेता लगेच त्याच्या कामामध्ये व्यग्र झाला.

आता प्रथमेश त्याच्या शूटिंगमधून वेळ काढून बायकोच्या माहेरी कोकणात गेला आहे. याच ठिकाणी या जोडप्याने त्यांची पहिली वटपौर्णिमा साजरी केली आहे. वटपौर्णिमाचा खास व्हिडीओ प्रथमेशची पत्नी क्षितिजाने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. प्रथमेश व क्षितिजा दोघेही जोडीने कोकणातील श्रीवर्धन येथे पोहोचले आहेत. याठिकाणी क्षितिजाचं गाव आहे. लग्नानंतर पहिल्यांदाच गावी गेलेल्या जावयाचं घोसाळकरांनी जोरदार स्वागत केल्याचं पाहायला मिळालं.

"फक्त सात जन्मासाठी... प्रत्येक जन्मासाठी! तूच पाहिजेस प्रथमेश... वडाच्या झाडासारखं आपलं नातं दीर्घायुषी असावं. जन्मोजन्मी फक्त तुझीच साथ असावी... वटपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा नवरोबा... सौ. क्षितिजा प्रथमेश परब" असं सुंदर असं कॅप्शन लिहित क्षितिजाने वडाची पूजा करतानाचा खास व्हिडीओ शेअर केला आहे. दोघांनी आज सणाच्या निमित्ताने पारंपरिक लूक केला होता. प्रथमेश आणि क्षितिजाने आज खास ट्विनिंग केल्याचं पाहायला मिळालं.

प्रथमेश-क्षितिजाची लव्हस्टोरी

प्रथमेश परबचं लग्न अगदी सुंदर पद्धतीने पार पडलं होतं. प्रथमेश-क्षितिजाची पहिली ओळख सोशल मीडियावर झाली होती. यानंतर दोघेही एका कॅफेमध्ये प्रत्यक्ष भेटले. दोघांमध्ये मैत्री होऊन पुढे या मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं. तीन वर्षे एकमेकांना डेट केल्यावर या जोडीने लग्नबंधनात अडकण्याचा निर्णय घेतला.

## अफगाणिस्तानला ऑल आऊट करत भारताचा दणदणीत विजय

टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये टीम इंडियाची विजयी मालिका सुरूच आहे. गुरुवारी झालेल्या सुपर८ सामन्यात भारताने अफगाणिस्तानविरुद्ध ४७ धावांनी विजय मिळवला. बार्बाडोसच्या केन्सिंग्टन ओव्हल मैदानावर भारताने प्रथम फलंदाजी करताना १८२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात अफगाणिस्तानचा संघ निर्धारित २० षटकांत १३४ धावांत गारद झाला. अफगाणिस्तानकडून अजमतुल्ला ओमरझाई (२६) याने सर्वाधिक धावा केल्या. नजीबुल्ला झदरन (१९), गुलबदिन नायब (१७), आणि मोहम्मद नबी (१४), नूर अहमद (१२) आणि सलामीवीर रहमानउल्ला गुरबाज यांनी ११ धावांचे योगदान दिले. इब्राहिम झादरान (८) आणि हजरतुल्ला झाझई (२) यांनाही विशेष काही करता आले नाही. भारताकडून जसप्रीत बुमराहने भेदक गोलंदाजी केली. त्याने चार षटकांत ७ धावा देऊन ३ विकेट घेतले. अर्शदीप सिंगनेही तीन विकेट घेतले. तर कुलदीप यादवने दोन, अक्षर पटेल आणि रवींद्र जडेजाने प्रत्येकी एक विकेट घेतली.

तत्पूर्वी, भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ८ बाद १८१ धावा केल्या होत्या. सूर्यकुमार यादवने २८ चेंडूत पाच चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने झंझावाती अर्धशतक झळकावले. भारताची सुरूवात अजिबातच चांगली झाली नाही. कर्णधार रोहित शर्माने (८) स्वस्तात विकेट गमावली. विराट कोहलीने (२४) ऋषभ पंत (२०) सोबत दुसऱ्या विकेटसाठी ४३ धावांची भागीदारी केली. शिवम दुबे (१०)




फार मोठी खेळी करू शकला नाही. सूर्यकुमारने हार्दिक पांड्यासोबत (३२) पाचव्या विकेटसाठी ६० धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. १७व्या षटकात सूर्या आणि १८व्या षटकात हार्दिक पॅव्हेलियनमध्ये परतला. सूर्यकुमारला सामनावीर म्हणून निवडण्यात आले. रवींद्र जडेजाने ७ आणि अक्षर पटेलने १२ धावांचे योगदान दिले. अफगाणिस्तानकडून कर्णधार रशीद खान आणि फजलहक फारुकीने प्रत्येकी तीन विकेट घेतले. नवीन उल हकला एक विकेट मिळाली.

T20 World Cup 2024, Afghanistan vs India Highlights: टी-२० वर्ल्ड कपमधील सुपर एट सामन्यात भारताने अफगाणिस्तानला ऑल आऊट करत 48 धावांनी मोठा विजय मिळवला.

अर्शदीपने सामन्याच्या अखेरच्या चेंडूवर अफगाणिस्तानला ऑल आऊट करत तब्बल ४८ धावांनी शानदार विजय मिळवला. बुमराह-अर्शदीपच्या जोडीने ३-३ विकेट्स घेत बॅकफूटवर टाकले आणि सूर्याच्या अर्धशतकी खेळीने संघाला सामन्यात कायम ठेवले.

१८ व्या षटकात अर्शदीपने शानदार गोलंदाजी करत सलग दोन लागोपाठ विकेट्स मिळवले. यासह अफगाणिस्तानचा संघाला सामन्यापासून अधिक दूर नेले. सुरूवातीच्या दोन षटकांमध्ये धुलाई झाल्यानंतर अर्शदीपने पुन्हा एकदा आपला क्लास दाखवला.

१७व्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर षटकार खाल्ल्यानंतर कुलदीपने चालाखी करत चेंडू टाकला आणि तिसऱ्या चेंडूवर मोठा फटका खेळण्याच्या नादात जडेजाकरवी झेलबाद झाला.

बुमराहने १६व्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर पुन्हा एकदा एका सामन्यात तीन विकेट्स घेतल्या आहेत. बुमराहने नजीबुल्लाहला अर्शदीपकरवी झेलबाद केले. यासह अफगाणिस्तान सामन्यात अधिक बॅकफूटवर गेला आहे.

कुलदीपनंतर जडेजाच्या खात्यातही विकेट मिळाली आहे. जडेजाने यंदाच्या टी-२० वर्ल्डकपमधील आपली पहिली विकेट मिळवली आहे. कुलदीपनंतर जडेजाने १२ व्या षटकातील पहिल्याच चेंडूवर सेट झालेल्या अझमतुल्ला ओमरझाईला पॅव्हेलियनमध्ये धाडले. ओमरझाई आणि गुलबदीन चांगली भागीदारी रचत होते पण भारताच्या गोलंदाजांनी ही भागीदारी तोडत मोठी विकेट मिळवली. ओमरझाईने २० चेंडूत २६ धावा करत बाद झाला नो बॉलने पहिले षटक सुरू केले आणि दुसऱ्या षटकात येताच विकेट घेतली. कुलदीपने ११व्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर गुलबदीन झेलबाद झाला. कुलदीपच्या चेंडूवर मोठा फटका खेळायला गेला पण चेंडू हवेत उंच उडाला आणि पंतने पुढे येत शानदार झेल टिपला. गुलबदीनने २१ चेंडूत १२ धावा करत बाद झाला.

अफगाणिस्तानने पॉवरप्लेमध्ये ३ बाद ३५ धावा केल्या आहेत. रहमानुल्ला गुरबाजने पहिल्याच षटकात तुफान फटकेबाजी केली आणि १६ धावा केल्या पण बुमराहने पुढच्या षटकात विकेट घेतली तर चौथ्या पाचव्या षटकात अक्षर आणि बुमराहने विकेट घेत अफगाणिस्तानच्या धावांना ब्रेक लावला. पाचव्या षटकातील पहिल्याच चेंडूवर बुमराहने हजरतुल्ला झाझाईला झेलबाद केले. यासह अफगाणिस्तानच्या धावांना मोठा ब्रेक लागला आहे.

पहिल्याच षटकात अफगाणिस्तानच्या रहमानुल्ला गुरूबाजने १३ धावा केल्या. यानंतर रोहितने बुमराहला पाचारण केले. दुसऱ्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर बुमराहच्या चेंडूने गुरबाजच्या बॅटची कड घेतली आणि चेंडू थेट पंतच्या हातात गेला. यासह बुमराहने येताच पुन्हा एकदा आपली कामगिरी चोख बजावली आणि भारताला महत्त्वाची विकेट मिळाली. अक्षर पटेलने अखेरच्या षटकात १४ धावा करत भारताची धावसंख्या १८० पार नेली. भारताने प्रथम फलंदाजी करताना ७ बाद १८१ धावा केल्या.

## अवघ्या काही मिनिटांत व्हाल तणावमुक्त अन् ताजेतवाने; करा फक्त



देशभरात आज आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सर्वत्र उत्साह आहे. आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तर तंदरुस्त ठेवू शकतोच; त्याशिवाय मनावरही चांगले संस्कार करू शकतो. तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग, असे म्हणता येईल. तणाव किती हानिकारक आहे याबद्दल आपण बरेच काही ऐकले आहे. तणाव हा माणसाचा सर्वांत मोठा शत्रू आहे. त्यामुळे अनेक आजारांचा धोका वाढत जातो. या तणावामुळे जगभरातील लोकांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर तणावाचे व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे. तणाव येत असेल, तर तुम्ही घरीच काही गोष्टी करू शकता. अवघ्या पाच मिनिटांच्या योगाने तुम्ही तणावमुक्त होऊ शकता.

अशा या योगाने नैराश्य आणि चिंता लक्षणीयरीत्या कमी होण्यास मदत होते. योगातज्ज्ञ कामिनी बोबडे यांनी दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे. यावेळी आज योगातज्ज्ञ कामिनी बोबडे यांनी सूर्यनमस्कार, नंतर योग निद्रा व त्यानंतर प्राणायाम करण्याची शिफारस केली आहे.

सकाळी उठल्यानंतर व्यायाम आणि योगासने केल्याने तुम्हाला निरोगी राहण्यास मदत होते. पण कोणताही योगा करण्यासाठी ही योग्य वेळ आहे. जसे सूर्यनमस्कार. सूर्यनमस्कार करण्याची उत्तम वेळ म्हणजे सूर्योदयाची वेळ म्हणजे पहाटे ४:४५ ते ६ दरम्यान सूर्यनमस्कार करावेत. विविध आसनांनुसार त्यांचे फायदे खालीलप्रमाणे :

सूर्यनमस्कार : त्वचा व केसांसाठी उपयुक्त

त्वचा आणि केसांची काळजी घेण्यासाठी उपयुक्त. सूर्यनमस्कारामुळे शरीर डिटॉक्सिफाय होऊन सौंदर्य वाढण्यास मदत होते. हे टाळूमध्ये रक्त परिसंचरण वाढवते आणि मुळांच्या विकासाला चालना देते. या क्रियेमुळे केसांना चांगले पोषण मिळते आणि त्यामुळे केस गळणे आणि पांढरे होण्यास प्रतिबंध होतो. त्याचप्रमाणे ते चेहऱ्यातील रक्ताभिसरण वाढवतात, तसेच त्वचा निरोगी, तरुण व चमकदार ठेवण्यास मदत करतात.

शवासन : तणावमुक्ती व पेशीदुरुस्तीसाठी फायदेशीर

१. शवासन केवळ शरीराला आराम देत नाही, तर ते ध्यानाच्या अवस्थेतदेखील घेऊन जाते. त्यामुळे शरीरातील पेशींना दुरुस्तीची संधी मिळते. तसेच तणावमुक्त होण्यास मदत होते.

२. शवासनाने शरीराला नवेपणा तर मिळतोच; शिवाय शरीराला ऊर्जाही मिळते. हे आसन वर्कआउट पूर्ण करण्यासाठी परफेक्ट आहे. विशेषतः जेव्हा तुम्ही खूप मेहनत केली आहे.

## दिनविशेष

**घटना**

२००७: सुनिता विल्यम - या सुमारे १९४ दिवस १८ तास पूर्ण करून सर्वाधिक काळ अंतराळात राहून पृथ्वीवर परतल्या.

१९९४: महाराष्ट्र सरकारचे महिलाविषयक धोरण जाहीर झाले. त्याद्वारे सरकारी व निमसरकारी नोकऱ्यामध्ये महिलांना ३० टक्के आरक्षण. १९९०: शीतयुद्ध - चेकपॉईंट चार्ली बर्लिनमध्ये उद्ध्वस्त केले गेले.

१९८६: हँड ऑफ गॉड गोल - अर्जेंटिना आणि इंग्लंड यांच्यातील १९८६ फिफा विश्वचषक सामन्याच्या उपांत्यपूर्व फेरीत डिएगो मॅराडोनाने केलेला प्रसिद्ध हँड ऑफ गॉड गोल..

१९८४ : व्हर्जिन अटलांटिक एअरवेज पहिले उड्डाण लंडन हिथ्रो विमानतळावरून सुरू झाले.

१९७८ : कॅरॉन, प्लूटोचा पहिला उपग्रह शोधण्यात आला.

१९७६: कॅनडा - देशाने मृत्यूदंडावर बंदी घातली.

१९४८: युनायटेड किंगडममधील आधुनिक इमिग्रेशन एचएमटी एम्पायर विंड्रश या जहाजाने ८०२ वेस्ट इंडियन स्थलांतरितांचा पहिला गट

आणला.

१९४८ : ब्रिटनने भारतावरील राज्यकारभार सोडल्याच्या अर्ध्या वर्षानंतर राजा जॉर्ज (सहावा) यांनी औपचारिकपणे भारताचा सम्राट ही पदवी सोडली.

**जन्म**

१९७४ : विजय भारतीय अभिनेते

१९५० : टॉम अल्टर भारतीय अभिनेते पद्मश्री (निधन: २९ सप्टेंबर २०१७)

१९३२ : अमरीश पुरी ज्येष्ठ भारतीय अभिनेते (निधन : १२ जानेवारी २००५)

१९०८ : डॉ. विष्णू भिकाजी कोलते महानुभाव पंथाचे अभ्यासक, विचारवंत व तत्त्वज्ञ, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू (निधन: ९ एप्रिल १९९८)

१८९९: रिचर्ड गिर्ली ड्रयू - मास्किंग टेपचे शोधक (निधनः १४ डिसेंबर १९८०)

**निधन**

२०१४ : रामा नारायणन भारतीय दिग्दर्शक आणि निर्माते (जन्म: ३ एप्रिल १९४९)

१९९४ : एल. व्ही. प्रसाद चित्रपट निर्माते व दिग्दर्शक (जन्म: १७ जानेवारी १९०८)

१९९३ : विष्णूपंत जोग - चित्रपट अभिनेते

१९५५: सदाशिव शिंदे- भारतीय क्रिकेटपटू (जन्म: १८ ऑगस्ट १९२३)

## राशि भविष्य

**मेष** शारीरक व्याधीपासून मुक्तता होण्याची शक्यता आहे. हुशारीने गुंतवणूक करा. एखाद्या धार्मिक स्थळी किंवा एखाद्या नातेवाईकाच्या घरी जाण्याचा विचार पुढे येईल. प्रेम प्रकरणात तुमच्याबद्दल गैरसमज होईल. व्यवसाय-धंद्यामध्ये नव्या संकल्पनांना सकारात्मक आणि ताबडतोब प्रतिसाद द्या.

**वृषभ** आरोग्याच्या दृष्टीने अतिशय चांगला दिवस. तुमचे उल्हसित मन तुम्हाला योग्य ती ऊर्जा पुरवेल आणि आपणास आत्मविश्वास मिळवून देईल. संयुक्त प्रकल्पात आणि संशयास्पद आर्थिक योजनांमध्ये गुंतवणूक करू नका. एखाद्या जुन्या मित्राच्या फोन मुळे सायंकाळ स्मरणरंजनात व्यतीत होईल.

**मिथुन** क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होऊन तुम्ही शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहाल. दिवसाच्या उत्तरार्धात आर्थिक स्थिती सुधारेल. कुटुंबियांच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत, यासाठी तुम्ही तुमच्या रागावर नियंत्रण ठेवा. राग हा केवळ काही काळापुरता केलेला वेडेपणा असतो आणि त्यामुळे तुमच्या हातून काही मोठ्या चुका घडू शकतात, याची जाणीव ठेवा.

**कर्क** परिस्थितीवर तुमचे नियंत्रण आले की तुमची चिंता नाहिशी होईल.साबणाच्या फुग्याला स्पर्श करताच तो जसा फुटून जातो तसेच हे असल्याचे तुमच्या लक्षात येईल जर तुम्ही आपल्या घरातील व्यक्तीकडून काही उधार घेतले असेल तर, आज त्यांना ते परत करा अथवा तुमच्या विरुद्ध ते कोर्टात कार्यवाही करू शकतात.

**सिंह** संयम बाळगा, आपले निरंतर प्रयत्न आणि समजून घेण्यामुळे आपणास हमखास यशप्राप्ती होणार आहे. तुमच्या पैशामुळे आज अनेक समस्या निर्माण होतील - तुमचा खर्च खूप अधिक होईल किंवा तुमचे पाकीट हरवेल - निष्काळजीपणामुळे काही तोटा निश्चितपणे होईल.

**कन्या** तुमची ऊर्जा पातळी खूप उच्च असेल. हुशारीने गुंतवणूक करा. दूरवर राहणारे नातेवाईक आज तुमच्याशी संपर्क साधतील. तुमच्या हृदयाला आवाहन करतील अशा एखाद्या व्यक्तीशी बेट होण्याचा जबरदस्त योग आहे. कामकाजाच्या ठिकाणी होणा-या बदलांमुळे तुम्हाला फायदा होईल.

**तूळ** तुमच्या मनावर ग्रासलेला विषाद काढून टाका - त्यामुळे तुमच्या प्रगतीत अडसर निर्माण झाला आहे. चढउतारांमुळे फायदा होईल. तुमचा मोकळा वेळ मुलांच्या सहवासात घालवा - मग त्यासाठी तुम्हाला नेहमीपेक्षा वेगळी क्लृप्ती करावी लागली तरी चालेल. प्रेमच प्रेम चोहीकडे, अशी तुमची स्थिती आहे.

**वृश्चिक** आपल्या आरोग्याची उगाच चिंता करु नका, त्यामुळे आपला आजार बिघडण्याची शक्यता आहे. गुंतवणूक करणे श्रेयस्कर आहे, पण त्यासाठी योग्य सल्ला घ्यावा. कुटुंबियांनी दिलेला चांगला सल्ला आज तुमच्यासाठी लाभदायक फळ देणारा असेल. प्रेम प्रकरणामध्ये स्वत:हून यशस्वी होण्यासाठी एखाद्याला निर्देशन करा.

**धनु** संयम बाळगा, आपले निरंतर प्रयत्न आणि समजून घेण्यामुळे आपणास हमखास यशप्राप्ती होणार आहे. आज तुम्ही त्या लोकांना उधार देऊ नका ज्यांनी तुमची मागील उधारी चुकवलेली नाही. तुमच्यातील लहान मूल जागे होईल आणि तुमची निष्पाप वागणूक यामुळे कुटुंबातील समस्या सोडविण्यात तुम्ही महत्त्वाची भूमिका बजावू शकाल.

**मकर** दुसऱ्यांवर टीका करण्याच्या सवयीमुळे तुम्हालाही टीका सहन करावी लागेल. तुमची विनोदबुद्धी जागृत ठेवा आणि बचावात्मक पवित्रा घेऊ नका आणि तसे केले तर गुप्तपणे केल्या जाणाऱ्या तुमच्यावरील शेरेबाजीलाही तुम्ही निष्प्रभ करू शकाल. तुमचा शेजारी आज तुमच्याकडून धन उधार मागण्यास येऊ शकतो.

**कुंभ** आजच्या दिवशी तब्येत एकदम उत्तम असेल. जीवनसाथी सोबत पैश्याने जोडलेल्या कुठल्या मुद्यांना घेऊन आज वाद होण्याची शक्यता आहे. आज तुमच्या व्यर्थ खर्चावर तुमचा साथी तुम्हाला लेक्चर देऊ शकतो. दिवसाच्या उत्तरार्धात होणारी एखाद्या जुन्या मित्राची भेट उल्हसित करेल.

**मीन** तुमची कमकुवत इच्छाशक्ती यामुळे तुम्ही भावनिक व मानसिकदृष्ट्या कमजोर बनू शकाल. तुम्हाला अफलातून नव्या संकल्पना सुचतील ज्यामुळे आर्थिक फायदा संभवतो. तुमचे ज्ञान आणि विनोदबुद्धी यामुळे तुमच्या अवतीभवतीचे लोक प्रभावित होतील.

# सातार्‍यात पोलीस भरतीसाठी आलेल्यांची पावसाने मंदावली पावले

● सातारा : सातारा पोलीस दलाच्या वतीने बुधवार दिनांक १९ जून पासून भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे. पण काल दुपारी तीन वाजल्यापासून कोसळणार्‍या पावसामुळे पोलीस भरतीसाठी शारीरिक चाचणी देताना अनेक उमेदवारांच्या पावलाची गती मंदावली आहे. या परीक्षा पुन्हा घेण्याची मागणी उमेदवारांकडून होऊ लागलेली आहे.

पाऊले चालली पंढरीची वाट या उक्तीप्रमाणे आषाढी एकादशी पूर्वीच वारकरी सज्ज झाले असतानाच सातारा पोलीस दलातही भरती होण्यासाठी पाऊले चालली कवायत मैदानावर चाचणीची वाट.... असे त्याचे वर्णन होऊ लागलेले आहे. पण, पावसामुळे यामध्ये व्यत्य आलेले आहे.

सातारा जिल्हा पोलीस दलाच्या वतीने पहिल्या दिवशी एक हजार उमेदवारांचे वजन, उंची हे शारीरिक मोजमाप व इतर मैदानी चाचणी घेण्यास सुरुवात झाली होती. बायोमेट्रिकचा वापर करून ही प्रक्रिया राबवण्यात येत असतानाच अचानक कोसळणार्‍या पावसामुळे उमेदवारांच्या धावण्याची गती अक्षरशः मंदावलेली आहे. पोलीस कवायत मैदानावर अनेक ठिकाणी पाणी व चिखलमातीचे थर साचल्यामुळे शहरी व ग्रामीण भागातून आलेल्या उमेदवारांना धावताना अनेक अडचणी येत होत्या. पोलीस शिपाई बँड वादक या पदासाठी २३५ जागांसाठी तेरा हजार उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. या पदासाठी सकाळी पाच वाजल्यापासून सातारा पोलीस कवायत मैदानावर युवक व तरुण सर्व कागदपत्र व शारीरिक



चाचणीसाठी जय्यत तयारी करत आहेत.

काल कोसळणार्‍या पावसामुळे उच्च पदवीधर त्याचबरोबर विविध क्षेत्रांमध्ये नोकरीसाठी प्रयत्न करणारे युवक व तरुण सुद्धा या पोलीस भरती मध्ये सहभागी झाले होते. पत्रकारिता पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेले व स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे ही हुशार विद्यार्थी आणि उमेदवारसुद्धा नोकरीची खात्री म्हणून भरती साठी आले होते. त्याचबरोबर अभियंता व इतर गोष्टींचे पदविका घेऊन आयुष्यभर आता पोलीस दलात बँड वाजवण्यासाठी वादक म्हणून तयार झाले आहेत. उमेदवाराची पात्रता पाहून गुणवत्तेनुसार त्यांना पुन्हा लेखी परीक्षेसाठी बोलवण्यात येणार आहे. यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. ही प्रक्रिया छत्रपती शाहू महाराजांच्या जयंती दिली म्हणजे दिनांक २६ जून पासून सुरू होणार आहे. सातारा जिल्हा पोलीस दलाच्या कवायत मैदानावर काल कोसळणार्‍या पावसामुळे अनेक उमेदवार चिंताग्रस्त झाले होते. भरती प्रक्रिया पूर्वी अनेकांनी जय्यत तयारी करताना उघड्या मैदानावर व डोंगर माथा, रस्त्यावर तयारी केली होती. पण चिखल व पाणी साचलेल्या मैदान व रस्त्यावर कुणीच तयारी केली नसल्यामुळे त्यांना परीक्षा देताना त्यांच्या पायाची गती मंदावली होती. याचा विचार करून पोलीस दलातील ही भरती प्रक्रिया वातावरण पाहून पुन्हा घ्यावी. अशी मागणी सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते श्री दत्ता केंगार, विकास भिलारे, रविंद्र जगताप व सातार्‍यातील ऍड. विकास पवार यांनी केलेली आहे. सातारा पोलीस कवायत मैदानावर काल दुपारी तीन वाजेपर्यंत ७२० भरतीसाठी आलेल्या उमेदवारांची वजन, उंची मोजमाप व वैद्यकीय प्राथमिक चाचणी घेण्यात आली.

■ अचानक कोसळणार्‍या पावसामुळे चाचणीच्या प्रतीक्षेत असणार्‍या उमेदवार व त्यांचे नातेवाईक यांना भिजतच उभे राहावे लागले. यामुळे अनेक जण गारठून गेले होते. काही उमेदवारांची गोळा फेक,१०० मीटर व सोळाशे मीटर धावणे. असे मैदानी प्रकार झाले. उर्वरित उमेदवारांना मैदानाची परिस्थिती पाहून त्यांची चाचणी घ्यावी. कारण, पोलीस कवायत मैदानावर सर्वत्र चिखल व पाणी साचल्यामुळे भरती प्रक्रियेसाठी पारदर्शक पणाने काम करणार्‍या पोलीस दलातील कर्मचार्‍यांना सुद्धा त्याचा त्रास होऊ लागलेला आहे.

■ गेली वर्षभर पहाटे लवकर उठून पोलीस भरतीसाठी प्रयत्न करणार्‍या अनेक युवकांना निसर्गानेच साथ द्यावी. यासाठी प्रार्थना केली जात आहे. अनेकांच्या कागदपत्रे तसेच कपडे व सोबत आलेले बूट पावसामुळे भिजल्याने त्यांना चाचणी देताना अडचणी येत आहेत. याची वरिष्ठांनी जाणीव ठेवून भरती प्रक्रिया थांबवावी व वातावरणातील बदल लक्षात घेऊन सोयीनुसार बदली प्रक्रिया राबवली तर खर्‍या अर्थाने गुणवत्तेला वाव मिळेल असे स्पष्ट करण्यात आलेले आहे. दरम्यान ,निवडणूक प्रचारासाठी युवक व तरुणांचा वापर केला जातो. तर दुसर्‍या बाजूला सातार्‍यात या भरती प्रक्रियेच्या उमेदवारांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी कुठल्याही राजकीय पक्षाचा नेता अथवा लोकप्रतिनिधी उपस्थित राहू शकला नाही. याचा आता युवक व तरुण विचार करू लागलेले आहेत.

## सातारा मुख्याधिकारी यांनी ठेकेदार अभिजीत बापटांची चौकशी करावी - विजय सोनवणे




● सातारा : सातारा नगरपालिका कंत्राटी कामगारांच्या प्रश्नाबाबत सातत्याने आंदोलन करत आहेत. याबाबत यापूर्वीच्या अनेक सातारा नगर पालिका मुख्याधिकार्‍यांनी कामगारांचे प्रश्न सोडवले आहेत .पण सध्या आंदोलन घंटागाडी कामगारांना बदनामी करण्यासाठी काही प्रवृत्तीला हाताशी धरले जात आहे. त्यामुळे सातारचे प्रामाणिक व कामगारांचे हिताचे निर्णय घेणारे मुख्याधिकारी यांनी ठेकेदार अभिजीत बापटांची चौकशी करावी.

अशी मागणी विजय सोनवणे यांनी पत्रकारांशी बोलताना केलेली आहे.याबाबत माहिती अशी की, सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दोन दिवसापासून कंत्राटी कामगार व जनता क्रांती दलाचे नेते सत्यवान कमाने यांच्या मार्गदर्शनाखाली या संघटनेचे पदाधिकारी विजय सोनवले, अक्षय भिसे, राणीताई किरतकर्वे व दत्ता केंगार, रोहिणी लोहार आणि घंटागाडी कंत्राटी कामगार ऊन-वारा- पावसाची तमा न बाळगता आंदोलन करत आहेत. हे आंदोलन लोकशाही मार्गाने चालत असून आंदोलन चिरडून टाकण्यासाठी बदनाम केले जात आहे. असे आरोप ही श्री सोनावले यांनी केलेला आहे.

दरम्यान, याबाबत सातारा जिल्हा प्रशासन व सातारा नगरपालिका प्रशासनाने गंभीर दखल घेतली नाही तर सातार्‍यातील सर्व कंत्राटी घंटागाडी कामगार हे कचरा संकलित करून सातारा जिल्हाधिकारी कार्यालयात टाकतील. असा इशारा देण्यात आलेला आहे.

# रायगडात आले मूठ्यांचे दिवस, गावागावात रात्री पकडण्याची लगबग व मज्जा

## आरोग्यवर्धक चविष्ट व लज्जतदार खवय्यांची पसंती



● पाली - पाली सुधागड सह रायगड जिल्ह्यात पावसाला काही दिवसांपूर्वी सुरुवात झाली आहे. त्यामुळे फक्त पावसाच्या सुरुवातीला मिळणार्‍या मुठ्यांचे (खेकड्याची एक जात) आगमन झाले आहे. त्यामुळे खवय्ये आनंदी आहेत. आरोग्यवर्धक, चविष्ट व लज्जतदार मूठ्यांना खवय्यांची पसंती असते. गावागावात रात्री अनेकजण मुठे पकडण्याची मज्जा लुटताना दिसत आहेत. पावसाच्या सरींमुळे माळरान, शेत, डोंगर उतारावर जमीन ओली झाली. गवताची कोवळी पाती डोलू लागली. आणि कोवळ्या गवतावर गुजरान करणारे व फक्त पावसाच्या सुरुवातीलाच बाहेर पडणारे मूठे बिळातून बाहेर आलेले पहायला मिळत आहेत. सध्या चिकन मटणाचे भाव देखिल वधारले आहेत. अशावेळी फक्त पावसाळ्यात बाहेर पडणारे मुठे खवय्यांना मेजवानी ठरतात.

सध्या मुठे मोठ्या प्रमाणात बाहेर पडत आहेत. दोन दिवसांपूर्वी मित्रपरिवारासह मोठ्या प्रमाणात मुठे पकडून आणले. दरवर्षी मुठे खाण्यासाठी पावसाची वाट पाहत असतो. खवय्यांना नेहमीच त्यांचे आकर्षण असते. मुठे पकडतांनाची मज्जा काही औरच आहे. मित्रापरिवाराला देखील मुठे भेट देतो.

**- राहुल कांबळे, पोलीस पाटील, कानसळ, सुधागड**

**चविष्ट आणि आरोग्यवर्धक**

आकाराने लहान असल्या तरी त्यांचे मांस चविष्ट व आरोग्यवर्धक असते. मुठे वेगवेगळ्या प्रकारे आणि पद्धतीने बनवून खाल्ले जातात. त्यातील सर्वात प्रसिद्ध पद्धत म्हणजे मुठ्यांचे कवच काढुन त्यामध्ये मुग, तांदूळ किंवा चण्याच्या पिठाचे मिश्रण भरले जाते. हे मिश्रण भरल्यावर धाग्याने पुन्हा कवच बांधुन कालवण तयार केले जाते. आतील गराबरोबरच हे भरलेले मिश्रण चविष्ट आणि लज्जतदार लागते.

**मित्रपरिवाला भेट**

विकत आणण्यापेक्षा अनेक जण मुठे व चिंबोर्‍या पकडणे पसंत करतात. मुठे व चिंबोर्‍या विकून आदिवासी बांधवांसह अनेकांच्या हाताला देखिल दोन पैसे मिळतात. काहीजण शेजारी व मित्रपरिवाला भेट म्हणून देखील देतात. मुंबई, पुणे आदी शहरांमध्ये राहणारे लोक गावाकडून हमखास मुठे नेतात किंवा आणायला सांगतात.

### आकर्षक रंग आणि ठेवण

इतर खेकड्यांपेक्षा आकाराने लहान असलेल्या मुठ्यांचा रंग तजेलेदार काळ व पिवळा असतो. पाठिचा भाग थोडा गोलाकार वर आलेला असतो. त्याचा रंग काळा पिवळा चकाकणारा असतो. पाय व नांगडे पांढरे-पिवळे तजेलदार असतात. एक नांगडा मोठा तर एक छोटा असतो. या सर्व वैशिष्यांमध्ये इतर खेकडे आणि चिंबोर्‍या यामध्ये ते उठून दिसतात.

### इथे सापडतात मुठे

पहिल्या पावसानंतर आलेले कोवळे गवत खाण्यासाठी मुठे बिळातून बाहेर पडतात. माळराण, शेत, डोंगर, ओहोळ, नदी आणि खाडीच्या किनारी मुठे सापडतात. रात्रिच्या वेळिच रिमझिम पावसात हे मुठे गवत खाण्यासाठी बाहेर पडतात. कोवळे गवत आपल्या नांग्यांनी तोडून बिळात नेवून निवांत खातात.

### असे पकडतात

रात्रीच्या वेळी रिमझिम पाऊस पडू लागल्यावर लोक मुठे पकडण्यासाठी बाहेर पडतात. हातात गॅस बत्ती, टॉर्च किंवा जळता टायर घेतला जातो. सोबत मुठे ठेवण्यासाठी सिमेंटची पोती, गोणपाट किंवा प्लास्टिकचा छोटा पिंप किंवा बादली असतो. रात्रभर माळराण, शेत, गवताळ भाग किंवा डोगर उतारावर फिरुन मुठे पकडले जातात. बत्तीच्या किंवा टॉर्चच्या उजेडात हे मुठे थांबतात मग दबक्या पावलांनी जावून त्यांना पकडून पोत्यात टाकले जाते. बर्‍याच वेळ फिरुन सुद्धा काहि वेळेस मुठे हाती लागत नाही. त्यासाठी निसर्गाची साथ व योग्य परिस्थिती असावी लागते.

# MPCB tells HC, court seeks effective steps

● MUMBAI - The Maharashtra Pollution Control Board (MPCB) on Thursday informed the Bombay High Court that so far it has conducted physical audits of 191 red category (highly polluting) industries in Mumbai Metropolitan Region (MMR) and has considered actions in 28 cases including issuance of show cause notice and interim directions.

Red category industries have a high pollution potential and include thermal power plants, large chemical industries and refineries

After the MPCB submitted that it is also taking steps to



upgrade monitoring of Air Quality Index (AQI) levels, the court said that it is an 'emergent situation' and 'it goes without saying' that equipment has to be updated with change in technology and the MPCB does not have to wait for court orders on the same.

The bench said that 'hotspots' can be identified only through efficient monitoring of air pollution levels and only then the authorities can take corrective and preventive measures to deal with the issue. A division bench of Chief Justice Devendra Kumar Upadhyaya and Justice Girish S Kulkarni was hearing a suo motu PIL and other pleas initiated and filed after noting various news reports, including the "Death by Breath" series by The Indian Express which presented an "alarming scenario" of air pollution, beginning in November 2023.

In March, this year, HC directed MPCB to initiate a rigorous air pollution audit of industries in MMR and said in the first phase, pollution audit of red-category industries can be undertaken. The MPCB had submitted a road map for the audit to be completed in fifteen months.

# Ice-cream firm rubbishes police claim of finding injured worker, says 'will make concrete proof public'

● PUNE - A DAY after Mumbai police, investigating the 'flesh found in ice-cream case', said they had traced the worker in Indapur's Fortune Dairy Industries who had met with an accident and had lost part of his finger, the ice cream company directors have refuted the claim. They said none of their workers had met with any such accident and that they would soon make public the 'concrete proof' they have.

On June 12, 26-year-old Brandon Ferrao, a Mumbai based doctor, filed a complaint with Malad police station when he found a piece of flesh with a nail in a Yummo's butterscotch



ice cream (whose parent company is Walko QSR Company) which he had ordered via delivery app Zepto. The Food Safety and Standards Authority of India (FSSAI) had started an inspection of the Indapur unit of Fortune Dairy Industries, Walko's third party manufacturer and had issued an order for production to be stopped. Mumbai police had, on Wednesday, identified the injured worker as Omkar Pote (24) who hails from Satara and is employed in the factory of Fortune Dairy Industries. Police said the worker admitted that on May 11 his finger was cut off when he was working at the scotch crushing machine. Police said they had sent his sample to the Forensic Sciences Lab to be matched with the piece of flesh found in the ice cream.Sachin Jadhav, one of the directors of Fortune Dairy Industries, said, "I want to assert that none of our staffers suffered any injury in which a finger was severed. We have earlier said this is an attempt to malign the image of the Yummo brand."

# A Benjamin Franklin quote, ED silence on how proceeds of crime were utilised in Goa elections by AAP

● DELHI - Three months after he was arrested by the Enforcement Directorate in a money laundering case related to the Delhi excise policy case being probed separately by the CBI, Chief Minister Arvind Kejriwal was granted bail by a Delhi court on Thursday.

"…ED is silent about the facts as to how the proceeds of crime have been utilised in Assembly Elections at Goa by AAP as admittedly after about two years, the bigger portion of the alleged amount remains to be traced out," Special Judge Niyay Bindu observed in her 25-page order granting bail to the Delhi CM.

While granting him bail on Thursday, Judge Bindu also declined the ED's plea to keep the bail order in abeyance for 48 hours. The ED approached the Delhi High Court on Friday against the grant of bail.

Commenting on the argument of the ED that investigation is an art,



the Court said this could mean that material is being "artistically" procured against the accused and this could also lead to the inference that the "agency was not acting without a bias."

"…the complete truth cannot be revealed by those persons who have resiled from their earlier statements," the Judge said, pulling up the Central probe agency for relying on the statements of other co-accused persons turning approvers. It was also observed by the Court that the ED was not able to prove that co-accused Vijay Nair was acting on the directions of CM Kejriwal. The Court also noted that even if co-accused Vinod Chauhan and Chanpreet Singh had "close relations with each other" and Kejriwal was acquainted with them, this would not help the agency to prove his guilt.

"This is also noticeable that in the cases under the PMLA, bail of the accused becomes an impossible task to obtain as on one pretext or the other investigating agency gives its own reasons which puts the accused in a situation almost equivalent to a convict without any hope to be released from the gloomy atmosphere of jail. The situation becomes… grave if later on, the accused comes out to be innocent and the agony he has undergone remains unexplained," the order said.

## पदवीधर निवडणुकीत निरंजन डावखरेंयांना मोठे मताधिक्य देणार - मा. आमदार धैर्यशील पाटील




● पेण - पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार निरंजन डावखरे यांच्या प्रचाराने पेण, सुधागड, रोहा, पाली रायगड सह संपूर्ण कोकण मतदार संघात वेग घेतला असतानाच भाजप जिल्हाध्यक्ष तथा मा. आमदार धैर्यशील पाटील, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी रायगड सह कोकपट्टी पिंजून काढली.कोकणच्या शैक्षणिक, रोजगार आणि पर्यटन विकासासाठी डावखरे यांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी पेण तालुक्यातील प्रायव्हेट हायस्कूल, न्यू व्हिजन हायस्कूल, ट्री हायस्कूल, कारमेल हायस्कूल यासह सुधागड पाली- पेण तालुक्यातील सर्व शाळांना भेटी देऊन शिक्षकांशी संवाद साधताना केले. यावेळी निरंजन डावखरे यांची विधान परिषदेतील वाट सोपी असल्याचा दावा भाजप जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी केला आहे.

## EVM ची विश्वासाहर्ता तपासण्यासाठी रोहित पवारांची थेट एलॉन मस्क यांना साद

● नवी दिल्ली, प्रतिनिधी :



अहमदनगरचे माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी ईव्हीएमच्या मतमोजणीवर संशय व्यक्त करत ४० मतदान केंद्रात पुन्हा मतमोजणी करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे अर्ज दाखल केला आहे. विखेंनी ईव्हीएमवर संशय व्यक्त केल्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी टोला लगावला आहे. माध्यमांशी संवाद साधताना रोहित पवार म्हणाले की, आपला पराजय होईल, असे सुजय विखे यांना वाटले नव्हते. भाजपचे नेते सांगतात ईव्हीएमवर शंका घेऊ नये. त्यामुळे सुजय विखे पाटील हे आता भाजपाच्या नेत्याच्या विरोधात जातात काय? असे चित्र दिसत आहे.

ईव्हीएमवर बोलत असताना रोहित पवार यांनी मुंबईतील उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातील वादावरही भाष्य केले. "मतमोजणी केंद्रावर निवडणूक आयोगाकडून निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली असते. त्यांच्याकडून मतमोजणीदरम्यान नक्कीच आकड्यांचा खेळ होऊ शकतो. उत्तर पश्चिम लोकसभेत उबाठा गटाचे अमोल किर्तीकर यांना सुरुवातीला विजयी घोषित केले होते.

# खरीप पिकांसाठी किमान हमी भावात वाढ

## केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

● नवी दिल्ली, प्रतिनिधी :

उत्पादकांना त्यांच्या उत्पादनांसाठी योग्य किंमत मिळावी यासाठी विपणन हंगाम 2024-25 करिता सर्व अनिवार्य खरीप पिकांच्या किमान हमी भावात (एमएसपी) वाढ करण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत बुधवारी घेण्यात आला. मागील वर्षाच्या तुलनेत, कारळे (₹983 प्रति क्विंटल), तीळ (₹632 प्रति क्विंटल), आणि तूर/अरहर (₹550 प्रति क्विंटल) यांसारख्या तेलबिया आणि कडधान्यांच्या एमएसपीमध्ये सर्वाधिक वाढ करण्यात आली आहे.

खरीप पिकांसाठी एमएसपी निश्चित करताना, भाड्याने घेतलेले मानवी श्रम, बैल मजूर/यंत्र मजूर, भाडेतत्वावर दिलेले भाडे, बियाणे, खते, सिंचन शुल्क इत्यादी खर्च, तसेच खेळत्या भांडवलावरील व्याज, पंप संच चालवण्यासाठी डिझेल/विद्युत खर्च आणि कौटुंबिक श्रमाचे योग्य मूल्य या सर्व घटकांचा विचार केला गेला आहे.

केंद्र सरकारने वर्ष 2024-25 साठी विपणन हंगामासाठी खरीप पिकांच्या किमान हमी भावात (एमएसपी) वाढ जाहीर केली आहे, जी केंद्रीय अर्थसंकल्प 2018-19 मध्ये ठरविलेल्या नियमानुसार उत्पादन खर्चाच्या किमान 1.5 पट असणार आहे. खासकरून, बाजरीसाठी (77%), तुरीसाठी (59%), मक्यासाठी (54%), आणि उडीदसाठी (52%) एमएसपीमध्ये उत्पादन खर्चाच्या तुलनेत जास्त लाभ मिळण्याची अपेक्षा आहे. इतर पिकांसाठी, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादन खर्चापेक्षा 50% अधिक लाभ मिळण्याची अपेक्षा आहे.

सत्यमेव जयते

■ देशात खरीप हंगामातील विपणनात 2003-04 ते 2013-14 या कालावधीत, बाजरीसाठी एमएसपीतील दर रु.745 रुपये प्रति क्विंटल आणि मुगासाठी रु.3,130 रुपये प्रति क्विंटल होता. त्यानंतर, 2013-14 ते 2023-24 या कालावधीत, एमएसपी मध्ये किमान परिपूर्ण वाढ झाली. मक्यासाठी 780 रुपये प्रति क्विंटल आणि कारळासाठी 4,234 रुपये प्रति क्विंटल होती.

■ वर्ष 2004-05 ते 2013-14 या कालावधीत, खरीप विपणन हंगामाअंतर्गत समाविष्ट 14 पिकांची खरेदी 4,675.98 लाख मेट्रिक टन होती, ज्यामुळे 2014-15 ते 2023-24 या कालावधीत या पिकांची खरेदी 7.58 लाख मेट्रिक टन होती.

■ वर्ष 2023-24 च्या तिसऱ्या सुधारित अंदाजानुसार देशातील एकूण अन्नधान्य उत्पादन 3,288.6 लाख मेट्रिक टन आणि तेलबियांचे उत्पादन 395.9 लाख मेट्रिक टन होणार असून, या वर्षाच्या उत्पादनाच्या अंदाजानुसार तांदूळ, कडधान्ये, तेलबिया, पौष्टिक तृणधान्ये/श्री अन्न आणि कापसाचे खरीप उत्पादन 1,143.7 एलएमटी, 68.6 एलएमटी, 241.2 एलएमटी, 130.3 एलएमटी आणि 325.2 लाख गाठी असण्याचा अंदाज आहे.

ही घोषणा सरकारने तृणधान्ये, कडधान्ये आणि पोषणमूल्य असलेली धान्य यासारख्या विविध पिकांच्या लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी केली आहे. भात (ग्रेड अ), ज्वारी (मालदांडी), आणि कापूस (लांब मुख्य) यासारख्या पिकांच्या उत्पादन खर्चाची स्वतंत्र माहिती उपलब्ध नसली तरी, शेतकऱ्यांना या पिकांसाठी देखील ५०% पेक्षा अधिक लाभ अपेक्षित आहे. सरकारने उच्च किमान हमी भाव देऊन पोषणमूल्य असलेल्या विविध पिकांच्या लागवडीला चालना देण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होईल तसेच विविध प्रकारचे अन्नधान्य उत्पादन वाढीस लागेल.

## रोज करा योग, नियमित रहा निरोग - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आवाहन

● मुंबई, प्रतिनिधी :




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगाला जगभर प्रसिद्धी मिळवून दिली. त्यातूनच 21 जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन जगभरात साजरा केला जात आहे. केवळ फोटोपुरते योग न करता योग हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक मानून रोज योग करून निरोग राहण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. गेट वे ऑफ इंडिया येथे मुंबई पोर्ट आणि इतर केंद्रीय संस्था, योग संस्थातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित योगा कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पवन बायेकर, जी.बी. मोरे यांच्यासह होमगार्ड, एनसीसी कॅडेट, अधिकारी, कर्मचारी, योग संस्थांचे योग गुरू उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, आज सर्व जगभर योगदिन साजरा करण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगाचे महत्व ओळखून संपूर्ण जगभर योगाला ओळख निर्माण करून दिली. तर योगगुरू रामदेव बाबा यांनी योग जगभर पोहोचविण्याचे काम केले. योगवर आपली प्राचीन संस्कृती आधारित असून त्यांनी योगाला घराघरात पोहोचविले. उत्तम आरोग्याचा नवा मंत्र योग आणि आयुर्वेद जडी-बुटी आहे. पंतप्रधान श्री. मोदी कधीच योग विसरत नाहीत, म्हणून ते तंदुरूस्त आहेत. भारताला पुढे नेण्यात ते अग्रेसर असून महाराष्ट्र त्यांच्या विकास कामाला नेहमी साथ देत राहणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, गेट वे ऑफ इंडिया येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाचा कार्यक्रम होत आहे, हा आनंदाचा क्षण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये योगासनाला आंतरराष्ट्रीय महत्व मिळवून दिले. सध्या जगातील १५० हून अधिक देशात योग साधना केली जात आहे. प्राचीन उपचार पद्धती जी आरोग्यदायी जीवनपद्धतीला सहाय्य करते, ही पद्धती जगाने स्वीकारली. आजच्या जीवनपद्धतीला योग साधना उपयुक्त असून सर्वांनी नियमित योग साधना करण्याचे आवाहन श्री. फडणवीस यांनी केले.

## आंतरराष्ट्रीय योग दिवस : उत्तम आरोग्यासह विश्वशांती साठी योग आवश्यक - राज्यपाल रमेश बैस

### राजभवन येथे राज्यपाल बैस यांच्या उपस्थितीत योग दिवस साजरा

● मुंबई, प्रतिनिधी :




योग ही भारताची जगाला अनमोल देणगी आहे. योगाच्या अमूर्त ठेव्याचे रक्षण करणे व त्याचा प्रचार - प्रसार करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्य उत्तम राखण्यासह योग विश्वशांती प्रस्थापित करण्यास आवश्यक आहे, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे केले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त राजभवन मुंबई येथील दरबार हॉल येथे राज्यपाल बैस यांच्या उपस्थितीत योगसत्राचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. योगसत्राचे आयोजन 'कैवल्यधाम' व श्रीमद राजचंद्र मिशन धरमपूर योग या संस्थांतर्फे संयुक्तपणे करण्यात आले. भारतीय तटरक्षक दल, सूचना प्रसारण कार्यालय व राजभवनातील अधिकारी व कर्मचारी यांनी यावेळी राज्यपालांसह योगासने केली. भारत जगातील सर्वाधिक युवा राष्ट्र आहे. योग देशातील युवाशक्तीच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक सशक्तीकरणात मदत करून स्वस्थ भारताचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सहायक सिद्ध होऊ शकतो, असे राज्यपालांनी सांगितले. आपण स्वत: नियमित योगासने करतो व प्रत्येक दिवस आपल्याकरिता योग दिवस असतो, असे राज्यपालांनी सांगितले.

यावेळी श्रीमद राजचंद्र मिशन धरमपूर संस्थेचे विश्वस्त आत्मप्रीत रक्षित, रतन लुणावत व अल्पा गांधी तसेच कैवल्यधाम योग संस्थेचे रवी दीक्षित प्रामुख्याने उपस्थित होते. रवी दीक्षित व देवकी देसाई यांनी योगसत्राचे संचलन केले.

## मातंग समाजाच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक - उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई

● मुंबई, प्रतिनिधी :



मातंग समाजाच्या विविध मागण्या आहेत. या मागण्यांच्या पूर्ततेसाठी शासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय स्मारक, वाटेगांव, जि. सांगली येथील अण्णाभाऊ साठे स्मारक, पुण्यातील लहुजी वस्ताद साळवे स्मारक, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेची (आर्टी) स्थापना आदींबाबत वेगाने कार्यवाही करण्यात यावी. मातंग समाजाच्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी शासन सकारात्मक आहे, असे उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी आज सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे याबाबत आयोजित बैठकीत मंत्री श्री. देसाई बोलत होते. बैठकीस सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव सुमंत भांगे, समाजकल्याण आयुक्त ओमप्रकाश बकोरिया, 'बार्टी'चे महासंचालक सुनील वारे, मातंग समाज शिष्टमंडळाच्यावतीने प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे, श्री. वाडेकर आदी उपस्थित होते. तर दुरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सांगलीचे जिल्हाधिकारी राजा दयानिधी सहभागी झाले होते.

काही राज्यात अनुसूचीत जाती प्रवर्गाचे जातीनिहाय उपवर्गीकरण केले आहे. त्या संदर्भात अवलंबिलेल्या कायदेशीर बाबींचा अभ्यास करण्यासाठी समिती पाठविण्यात आली आहे. ज्या राज्यांमध्ये ही व्यवस्था तेथील पूर्ण अभ्यास करून समितीच्या अहवालानंतर कार्यवाही करण्यात येईल. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या धर्तीवर साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळामार्फत समाजाच्या आर्थिक उत्थानासाठी योजना राबविण्याबाबत प्रस्ताव तयार करण्याच्या सूचनाही मंत्री श्री. देसाई यांनी दिल्या.

वाटेगांव येथील स्मारकासाठी जमीन भूसंपादन कायद्यानुसार संपादित करण्याच्या सूचना, मंत्री श्री. देसाई यांनी यावेळी सांगली जिल्हाधिकारी यांना दिल्या. तसेच लहुजी साळवे स्मारकाच्या कामाला पुणे येथे असताना भेट देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

## शेतकऱ्यांनी डीएपी खतास पर्यायी खते वापरावीत

### कृषी विभागाचे आवाहन

● मुंबई, प्रतिनिधी :



चालू खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांनी केवळ डीएपी (Di-Ammonium Phosphate) खतावरच अवलंबून न राहता बाजारात उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून राज्यातील सर्व शेतकऱ्यांना करण्यात येत आहे. महाराष्ट्र हे मृद परिक्षण व जमीन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरिता अग्रेसर आहे. राज्यामध्ये सध्या पेरणीला सुरुवात झाली असून डीएपी खताची शेतकऱ्यांकडून जास्त मागणी आहे. डीएपी खतामध्ये 18 टक्के नत्र तर 46 टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत.

डीएपी खताची कमतरता भरुन काढण्यासाठी पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरद युक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी (Single Super Phosphate) या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-16 टक्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामुळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डीएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डीएपी खतास चांगला पर्याय आहे.

एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके-10:26:26, एनपीके-20:20:0:13, एनपीके-12:32:16 व एनपीके-15:15:15 या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुद्धा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो.

## उभ्या लक्झरी बसला ट्रेलरची मागून जोरदार ठोकर

### एक मृत्युमुखी, ट्रेलर चालक फरार

● पोलादपूर, प्रतिनिधी :



मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर अपघातांची मालिका ही सुरूच असून बुधवारी सकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास पोलादपूर ग्रामीण रुग्णालयासमोर लक्झरी बस व ट्रेलरचा अपघात झाला. या अपघातात एक प्रवासी मृत्युमुखी तर एकरा प्रवासी जखमी झाले आहेत. चालक शुभम दीपक दरेकर(वय २६ वर्ष, रा. पोलादपूर) हा आपल्या ताब्यातील बस क्रमांक एमएच ०३ डीव्हि ७५९९ ही मुंबईहून पोलादपूर कामथेकडे घेऊन जात असताना पोलादपूर ग्रामीण रुग्णालयासमोर प्रवासी उतरण्यासाठी थांबले असता मागून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रेलर क्रमांक आरजे ०९ जीडी ४५७६ याने मागून जोरदार ठोकर दिल्याने रवींद्र यशवंत सकपाळ (वय ५५ वर्ष, रा. पोलादपूर) यांचा जागीच मृत्यू झाला. विश्वनाथ विठोबा उतेकर (वय ३२ वर्षे, मोरसडे), चालक शुभम दीपक दरेकर (वय २६ वर्ष, रा. पोलादपूर), संतोष गेनू केसरकर (वय ४८ वर्ष राहणार देवळे), महादेव सखाराम गोगावले( वय ५५ वर्ष राहणार बोरघर), ओमकार चंद्रकांत सकपाळ (वय २४ वर्ष राहणार कापडे), नारायण श्रीपत सणस (वय ७२ वर्षे राहणार वडघर), सुरज सखाराम तांबे (वय ३० वर्ष राहणार कामथे), निखिल रवींद्र सकपाळ (वय ३० वर्ष राहणार पोलादपूर), विष्णू तुकाराम सणस (वय ६० वर्ष राहणार वडघर), जनाबाई सुरेश शिलिमकर (वय ४८ वर्ष राहणार वडघर) हे एकरा प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींना तात्काळ पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## सांबारमध्ये आढळला मृत उंदीर

### गुजरातमधल्या प्रसिद्ध देवी डोसा सेंटरमधला धक्कादायक प्रकार

● गुजरात, प्रतिनिधी :



बंगळुरुत ॲमेझॉनच्या पार्सल बॉक्समध्ये साप आढळल्याची घटना ताजी असताना आणि हर्षी चॉकलेटमध्ये मृत उंदीर तसंच आईस्क्रीममध्ये बोट आढळल्याचे प्रकार उघड झाले असताना आता अशीच एक बातमी गुजरातमधून समोर आली आहे. अहमदाबाद येथील प्रसिद्ध देवी रेस्तराँमध्ये सांबाराच्या वाटीत उंदीर आढळून आला आहे.

अहमदाबाद येथील देवी डोसा रेस्तराँ हे प्रसिद्ध रेस्तराँ आहे. या ठिकाणी अनेक लोक आवडीने पदार्थ खायला येत असतात. याच हॉटेलमध्ये सांबारात मृत उंदीर आढळल्याने खळबळ उडाली आहे. या ठिकाणी ईडली, डोसा, उत्तपा तसंच इतर दाक्षिणात्य पदार्थ खायला मिळतात आणि लोकांची या ठिकाणी गर्दी होते. अहमदाबाद येथील निकोल भागात देवी डोसा सेंटर हे प्रसिद्ध रेस्तराँ आहे. या रेस्तराँमध्ये नाश्ता करण्यासाठी अनेकदा लोक येतात. इथल्या खास चवीमुळे हे रेस्तराँ प्रसिद्ध आहे असंही सांगितलं जातं. याच रेस्तराँमध्ये ही घटना घडली आहे. देवी रेस्तराँमध्ये एका ग्राहकाने डोसा आणि ईडली मागवली. त्यातल्या सांबार वाटीत उंदीर आढळला. यानंतर या ग्राहकाने अहमदाबाद महापालिकेत धाव घेतली आहे. अन्न आणि औषध प्रशासनाकडे आणि आरोग्य विभागाकडे तक्रार केली आहे. त्यानंतर आरोग्य विभागाने या रेस्तराँला नोटीस बजावली आहे. या रेस्तराँची जेव्हा पाहणी केली तेव्हा सांबार आणि चटणीयांसारखे पदार्थ उघड्यावर ठेवल्याचंही दिसून आलं. या ठिकाणाहूनच ते लोकांना दिले जात होते असंही दिसतं आहे. त्यामुळे या ठिकाणी उंदीर पडला असण्याची शक्यता आहे असंही लोक व्हिडीओ पाहून म्हणत आहेत. अहमदाबाद अपडेट्स या इंस्टाग्राम पेजवर हा व्हिडीओ पोस्ट करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा अधिकारी भाविन जोशी यांनी घडल्या प्रकाराबाबत ANI ला सांगितलं की , अहमदबाद महापालिकेने या प्रकरणी तातडीने लक्ष घातलं पाहिजे. तसंच अशा घटना टाळण्यासाठी आणि ग्राहकांना त्रास होऊ नये यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

ज्या ग्राहकाला हा अनुभव आला त्याने या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केला आहे. सांबारात पडलेल्या या उंदराचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतो आहे. त्यावर लोक विविध कमेंटही करत आहेत. टेबलाखालून पैसे घेऊन असल्या हॉटेल्सना संमती देऊ नका आणि लोकांच्या जिवाशी खेळ करु नका असं काही नेटकऱ्यांनी म्हटलं आहे. असल्या हॉटेल्समध्ये जाण्यापेक्षा महाग हॉटेल्समध्ये गेलं पाहिजे असाही सल्ला काहींनी दिला आहे. खाण्याचा दर्जा दिवसेंदिवस बिघडत चालला आहे असंही काहींनी म्हटलं आहे.

## फ्रेंड्स ऑफ नेचरचे पदाधिकारी व पोलिसांनी वाचविले सापांचे जीव

● उरण, प्रतिनिधी :



१९ जून २०२४ रोजी संध्याकाळी उरण मधील पोलीस कर्मचारी खैरावकर यांचा फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) च्या हेल्पलाईन वर कॉल आला , की खोपटा पुलाच्या चौकाच्या पुढे करंजा रोड लगत जाळयात २ साप अडकले आहेत. सेवेवर असणाऱ्या पोलीसांच्या या जाळयात अडकलेल्या सापांवर लक्ष गेलं आणि त्यांनी मदतीसाठी कॉल केला.जर हे जाळयात अडकलेले साप त्यांच्या नजरेत पडले नसते तर ते तडफडून मेले असते. अंधार पडत चालला होता ,पावसाने चांगला जोर धरला होता.कॉलरने लोकेशन शेअर केले होते.ट्रॅफिक आणि पावसामुळे तिथे पोहोचायला उशीर होत होता. लोकेशनवर जाऊन पाहिलं तर फुल साईझ चा धामण साप जाळयात अडकला होता, सुटकेच्या प्रयत्नात थकला होता. फ्रेंड्स ऑफ नेचरच्या पदाधिकारी असलेल्या सर्पमित्रांनी लवकरात लवकर या सापांची सुटका करून पिशवीत भरले व दुसऱ्या सापाचा शोध घेतला.दुसरा धामण साप दिसून येत नव्हता,एका प्लायवूडच्या खाली असल्याकारणाने कोणाच्या नजरेस येत नव्हता.मानेच्या बाजूला जाळयाचे २ धागे अडकले होते.त्याला जाळेमुक्त करून लवकरात लवकर दोन्ही ही धामण साप सुरक्षित ठिकाणी मुक्त केले.याकामी पोलीस हवालदार, खैरावकर(उरण वाहतूक शाखा), पोलीस कॉन्स्टेबल गायकवाड(उरण वाहतूक शाखा), पोलीस नाईक मस्के (उरण पोलीस स्टेशन),पोलीस नाईक मुळे(उरण पोलीस स्टेशन) व स्नेहा जोशी यांचे सहकार्य लाभले.सापाचे प्राण वाचविणाऱ्या केअर ऑफ नेचर या पर्यावरण प्रेमी संघटनेचे पदाधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांवर सर्वच स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.